७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६
www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# दोन सराईत टोळ्या गजाआड, २३ गुन्ह्यांचा छडा

**मंचर (दै. संध्या)**




पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने प्रभावी कारवाई करत जबरी चोरी, चेन स्नॅचिंग, घरफोडी आदी गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या दोन सराईत टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत एकूण २३ गुन्ह्यांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

या गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेले सुमारे ३२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, मोटारसायकली तसेच इतर साहित्य असा एकूण सुमारे ४६ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याबाबतची माहिती पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी शनिवारी पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सन २०२५-२६ दरम्यान वाढलेल्या चोरी व घरफोडीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सराईत गुन्हेगारांवर लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार पथकाने गुन्हेगारांच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवून तपासाची दिशा निश्चित केली.

घटनास्थळांची पाहणी, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी तसेच फिर्यादी व साक्षीदारांकडून मिळालेल्या माहितीद्वारे आरोपींची ओळख पटविण्यात आली. या तपासात नारायणगाव व मंचर पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील हर्षल दत्तात्रय तांदळे (वय २५) व महेश दत्तात्रय मंगळवेढेकर (वय २५, रा. मंचर) यांचा सहभाग निष्पन्न झाला. पोलिसांनी १६ एप्रिल रोजी पारगाव कारखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोंदेवाडी फाटा परिसरातून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी पारगाव कारखाना, घोडेगाव, नारायणगाव, जुन्नर व आळेफाटा परिसरातील एकूण सहा गुन्ह्यांची कबुली दिली. या गुन्ह्यांमधील सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने, एक पल्सर मोटारसायकल व इतर साहित्य असा सुमारे २९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हर्षल तांदळे याच्यावर विविध पोलीस ठाण्यांत सात गुन्हे दाखल असून जानेवारी २०२६ मध्ये त्याच्यावर पुणे जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्याची कारवाई करण्यात आली होती. तसेच महेश मंगळवेढेकर याच्यावर चाकण व वाकड पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, दुसऱ्या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने पियुष बिरम नानावत (रा. सांगेशी, कामशेत, ता. मावळ) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तो काही महिन्यांपूर्वी बालसुधारगृहातून बाहेर आल्याचे समोर आले. त्याने दोन विधीसंघर्षित बालकांच्या मदतीने उरुळी कांचन, दौंड, लोणावळा, वडगाव मावळ, राजगड, बारामती, भोर, जुन्नर, खेड, शिरूर, सासवड, वेल्हा व यवत या भागांत एकूण १७ गुन्हे केल्याची कबुली दिली. या कारवाईत पोलिसांनी एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले असून सुमारे १२ तोळे सोन्याचे दागिने व एक मोटारसायकल असा सुमारे १७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईमुळे पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले ढिकले कुटुंबियांचे सांत्वन



**नाशिक (दै. संध्या)**

नाशिक (पूर्व) विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. राहुल ढिकले यांच्या पत्नी आदिती ढिकले यांचे हृदयविकाराने आज निधन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार ॲड. ढिकले यांच्या निवासस्थानी भेट देवून ढिकले कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी त्यांचे समवेत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार सरोज अहिरे, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, तहसलीदार पंकज पवार, अपर तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## मिशन बालस्नेही महाराष्ट्र : प्रायोगिक टप्प्यात १०२ ग्रामपंचायती 'बालस्नेही' होणार

**मुंबई (दै. संध्या)**




मिशन बालस्नेही महाराष्ट्र उपक्रमांतर्गत ३४ जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदांमधील प्रत्येकी तीन अशा एकूण १०२ ग्रामपंचायती 'बालस्नेही ग्रामपंचायत' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. या ग्रामपंचायतींमध्ये नियमित बालसभा आयोजित केल्या जातील तसेच सक्रिय बाल पंचायतांच्या माध्यमातून मुलांना त्यांच्या जीवनाशी संबंधित विषयांवर आपला आवाज मांडण्याचा अधिकार दिला जाणार आहे, अशी माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष डॉ. संजय पुराणिक यांनी दिली आहे.

राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, यशदा आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन बालस्नेही महाराष्ट्र'च्या राज्यव्यापी अंमलबजावणीसंदर्भात धोरणात्मक सल्लामसलत बैठक नुकतीच मुंबईत आयोजित करण्यात आली होती. यावेळी यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, कोर फॅकल्टी डॉ. आर. व्ही. पोळे, युनिसेफच्या सोशल पॉलिसी स्पेशालिस्ट डॉ. देविका देशमुख उपस्थित होते. बैठकीत मुलांना शासनाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. राज्य आणि देशाच्या प्रगतीचा पाया हा मुलांच्या आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि संधींवर अवलंबून असल्याचे नमूद करण्यात आले. बालहक्क हे बहुआयामी असल्याने शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता, महिला व बालविकास आणि ग्रामीण विकास विभागांमध्ये प्रभावी समन्वय आवश्यक असल्यावर भर देण्यात आला. हा उपक्रम शाश्वत विकास ध्येयांशी संलग्न असून दारिद्र्य निर्मूलन, पोषण सुरक्षा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, लैंगिक समता आणि विषमता कमी करणे या उद्दिष्टांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. याशिवाय सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे बालस्नेही शासन, स्थानिक नियोजन आणि उत्तरदायित्व याबाबत क्षमतावर्धन करण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.

# भारतदुर्गा मंदिर नवचेतना जागृत करून प्रेरणा देईल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात भारतदुर्गा मंदिराचा शिलान्यास

**केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती**

**नागपूर (दै. संध्या)**



नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात भारतदुर्गा मंदिराची निर्मिती होत आहे. ही शक्तीची मूर्ती देशभरात नवचेतना जागृत करुन आपल्या साऱ्यांना प्रेरणा देईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात डॉ. आबाजी थत्ते सेवा आणि अनुसंधान संस्थेच्या वतीने भारतदुर्गा मंदिर उभारण्यात येत असून या मंदिराचा शिलान्यास आज सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात आला. शिलान्यास सोहळ्यानंतर धर्मसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, धर्माचार्य श्रीकार्ष्णि पीठाधीश्वर श्री गुरुशरणानंद जी महाराज, श्री जुना पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरीजी महाराज, स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, चिन्मय मिशनचे स्वामी मित्रानन्दजी महाराज, साध्वी ऋतंभरा देवी जी तसेच बागेश्वर धामचे श्री धीरेंद्र कृष्ण शास्त्री, डॉ. आबाजी थत्ते सेवा आणि अनुसंधान संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, सचिव शैलेश जोगळेकर, उपाध्यक्ष अजय संचेती, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आजचा दिवस महत्त्वपूर्ण आहे. आज दोन शिलान्यास कार्यक्रम झाले आहेत. या अनुषंगाने नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट आणि भारत दुर्गा मंदिराची निर्मिती करण्यात येणार आहे. भारत दुर्गा मंदिरातील मूर्ती नवचेतना देईल, प्रेरणा मिळेल. केवळ शक्ती नव्हे तर भक्तीचीही प्रेरणा ठरेल असे ते पुढे म्हणाले.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट विषयी बोलताना ते म्हणाले की, गरिबांपर्यंत कर्करोगावरील दर्जेदार उपचार आणि सेवा पोहोचावी हा एनसीआयचा उद्देश होता. त्यातूनच एनसीआयची स्थापना झाली आहे. त्यानंतर आता या परिसरात मंदिराची निर्मिती करण्यात येणार आहे. आज शिलान्यास झालेली नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट कॉर्पोरेट हॉस्पिटलच्या दर्जाची असेल, असेही ते पुढे म्हणाले.

भारतदुर्गा मंदिराचा आजचा शिलान्यास सोहळा हा अत्यंत आनंदाचा क्षण आहे. नव भारत निर्माणाची प्रेरणा यातून आपल्याला मिळेल. नागपूर देशाच्या मध्यस्थानी आहे. त्यामुळे अनेकांसाठी हे ठिकाण येण्यासाठी सोईचे व प्रेरणादायी ठरेल, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले.

## ब्रेकिंग न्यूज

### जिल्हा परिषद शाळेत प्रथमच रोबोटिक लॅब

बेल्हे (दै. संध्या) : बेल्हे (ता. जुन्नर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (बेल्हे नं. १) या शाळेमध्ये येथील भूमिपुत्र व सिमु सॉफ्ट कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील चोरे व गणेश चोरे यांच्या कुटुंबाच्या वतीने, नुकतीच त्यांच्या मातोश्री स्व. यमुनाबाई चोरे यांच्या स्मरणार्थ जवळपास २० लाख रुपये खर्च करून विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत न्यू एज टेक्नॉलॉजी स्किल लॅब (ए. आय. अँड रोबोटिक लॅब) उभारण्यात आली आहे. बेल्हे येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कै. सौ. यमुनाबाई सीताराम चोरे ए.आय. अँड रोबोटिक लॅब व ग्रंथालय लोकार्पण सोहळा तसेच ग्रंथ तुला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुसज्ज ए. आय. रोबोटिक लॅब व वाचनालयाचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील व अहिल्या नगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्नर पंचायत समितीचे सदस्य राजेंद्र पिंगट होते. या कार्यक्रमप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या स्मिता कणसे, जुन्नरचे गट विकास अधिकारी प्रतिक चन्नावार, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, गट शिक्षण अधिकारी अशोक लांडे, सिमु सॉफ्ट कंपनीचे सुनील चोरे, गणेश चोरे, अंजली साठे, डॉ. विद्या चोरे, मुख्याध्यापक सखाराम शेंडकर, प्रितम मुंजाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## आरोग्य सुविधांतही वाढ; व्यापारासाठी प्रसिद्ध अशी जालना जिल्ह्याची ओळख

# विकासाच्या वाटेवर जालना प्रकाशमान



**तुती लागवडीचे पाच हजार एकरचे उद्दिष्ट**

रेशीम कोषांसाठी आवश्यक असणाऱ्या तुती लागवडीसाठी या जिल्ह्यात शासकीय पातळीवर गेल्या काही वर्षांपासून विशेष प्रयत्न केले जात आहेत. 'मेरा रेशीम-मेरा अभियान' या शासनाच्या कार्यक्रमात राज्यातील जालना जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. शेती व्यवसायास जोडधंदा देणाऱ्या तुती लागवडीचे येत्या वर्षांत आणखी पाच हजार एकरचे उद्दिष्ट आहे. जालना येथील रेशीम कोष बाजारपेठेत मागील आठ वर्षांत जवळपास ३२ हजार क्विंटल आवक झालेली असून, त्याची किंमत १३७ कोटी रुपये आहे.

**जालना (दै. संध्या)**

व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या जालना जिल्ह्याची ओळख मागील पाच-सहा दशकांत बियाणे, पोलाद आणि मागील काही वर्षांत रेशीम कोष उत्पादनासाठी झालेली आहे. तुती लागवडीपासून रेशीम कोष उत्पादनापर्यंतची साखळी विकसित होत असताना विकासाचे चक्र 'सीड, सिल्क आणि स्टील' असे फिरते आहे.

जालना शहराच्या औद्योगिक वाटचालीत बांधकामासाठी लागणाऱ्या लोखंडी सळ्या तयार करणाऱ्या उद्योगांचा मोठा वाटा आहे. या उद्योगास मोठ्या प्रमाणावर विजेची आवश्यकता असते. २०२५-२०२६ वर्षातील दरडोई औद्योगिक वीज वापरात जालना जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जालना औद्योगिक वसाहतीमधील बांधकामासाठी लागणाऱ्या लोखंडी सळ्या उत्पादित करणाऱ्या उद्योगांचे वार्षिक वीज बील हजार ते दीड हजार कोटींच्या दरम्यान असल्याने एकूण वीज वापरात हा जिल्हा राज्याच्या २०२५-२०२६ च्या आर्थिक पाहणीत ठळकपणे दिसून येतो. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात सार्वजनिक आणि आरोग्य सुविधांमध्ये वाढ झाली आहे. २०२४-२०२५ च्या अधिकृत माहितीनुसार जिल्ह्यात १४ शासकीय रुग्णालये, ४४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २२३ आरोग्य उपकेंद्रे आहेत. सार्वजनिक आणि शासन सहाय्यित रुग्णालयांतील खाटांची संख्या १ हजार ७४१ असून, त्यापैकी ६७३ स्त्री रुग्णांसाठी आहेत. जिल्ह्यातील खासगी रुग्णालयांची संख्या ५३० असून, त्यामधील खाटांची संख्या ९ हजार ३३४ आहेत. यापैकी २७७ रुग्णालये जालना शहर आणि तालुक्यात आहेत. खासगी रुग्णालयांतील एकूण उपलब्ध खाटांपैकी निम्म्यापेक्षा अधिक म्हणजे ५ हजार ८०१ जालना शहरात आहेत. जालना महानगरपालिकेचे दवाखानेही जालना शहरात आहेत. छत्रपती संभाजीनगर शहराच्या लगत असलेल्या या जिल्ह्यातील रुग्णांना तेथील आरोग्य सुविधांचा लाभही मोठ्या प्रमाणावर होतो.

## कुंभमेळा विकास कामांना अधिक गती देणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नाशिक (दै. संध्या)**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे विकास कामे समाधानकारकरितीने होत असून आगामी काळात या कामांना अधिक गती देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हिरामण खोसकर, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, महंत हरिगिरीजी महाराज (जुना आखाडा), महंत रविंद्रपुरीजी महाराज (निरंजनी आखाडा), महंत शंकरानंद (आनंद आखाडा), महंत गिरिजानंद, महंत रामकृष्ण लहवितकर यांच्यासह मंदिर देवस्थानचे विश्वस्त उपस्थित होते.

मंदिर देवस्थानच्या वतीने मुख्याधिकारी योगेश जाधव, कैलास घुले, मनोज थेटे यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा सत्कार केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी कुंभमेळा होत आहे. त्या अनुषंगाने विविध विकास कामे करण्यात येत आहेत. सिंहस्थ कुंभमेळा जवळ येत आहे. त्यामुळे या कामांना अधिक गती देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्र्यंबकेश्वर येथील विकास कामाच्या अनुषंगाने येथील सर्व आखाड्यांच्या महंतांशी लवकरच चर्चा करणार असून त्यासाठी एक बैठक घेणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# संपादकीय

## कोणते तेल सर्वोत्तम?

नाभीला तेल लावणे ही ''नाभी पुराण'' नावाची आयुर्वेदिक पद्धत आहे. यामुळे पचन सुधारते, त्वचा उजाळचे आणि तणाव कमी होतं असं म्हटलं जातं. नाभी पोटाच्या मध्यभागी असते, तिची त्वचा पातळ असते आणि त्यात अनेक लहान रक्तवाहिन्या असतात. आयुर्वेदानुसार, नाभी शरीराचे केंद्र असल्याने आणि अनेक नसांशी जोडलेली असल्याने, ती तेल शोषून घेते आणि त्वचा, पचन, हार्मोन्स आणि दृष्टी सुधारण्यास मदत करते. नाभीला तेल लावणे हा वैद्यकीय उपचार नसला तरी, ही एक पारंपारिक आणि आयुर्वेदिक पद्धत आहे. जी त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि शांत करते. तसंच पचन आणि किरकोळ त्वचेच्या समस्या (जसे की फाटलेले ओठ, कोरडेपणा किंवा सौम्य जळजळ) दूर होण्यास मदत होते. झोपण्यापूर्वी नाभीला तेल लावणे योग्य आहे. असं नियमितपणे केल्यास, त्वचा आणि शरीर शांत होऊ होते.

संस्थापक आणि त्वचारोगतज्ञ प्रीती चड्ढा यांच्या मते, झोपण्यापूर्वी बदाम, नारळ किंवा मोहरीचं तेल नियमितपणे नाभीवर लावल्याने त्वचा आणि शरीराला आराम मिळतो. मात्र हे लक्षात ठेवणे गरजेचं आहे की हे कोणत्याही गंभीर आजारावर उपचार नाही...

एरंडेल तेल : एरंडेल तेल घट्ट असते आणि हळूहळू शोषले जाते. त्यामुळे कोरडेपणा किंवा पोटात हलका त्रास असलेल्यांसाठी ते फायदेशीर ठरते. पारंपारिकपणे, ते त्वचेला मऊ करण्यासाठी आणि सौम्य उबदारपणा देण्यासाठी वापरले जाते. रात्री तेलाचे काही थेंब लावल्याने नाभीभोवतालची त्वचा शांत होण्यास मदत होते. त्याचा मुख्य फायदा म्हणजे अंतर्गत स्वच्छता नव्हे तर ओलावा टिकवून ठेवणे. कोल्ड-प्रेस केलेले, हेक्सेन-मुक्त एरंडेल तेल सर्वोत्तम काम करते.

नारळ तेल: नारळ तेल बहुतेक त्वचेच्या प्रकारांना शोभते. त्यात नैसर्गिक फॅटी ॲसिड असतात जे त्वचेच्या अडथळ्याचे संरक्षण करण्यास मदत करतात. नाभीवर लावल्याने ते घट्ट कपडे किंवा घामामुळे होणारी कोरडेपणा आणि सौम्य जळजळ कमी करू शकते. त्याची हलकी पोत दैनंदिन वापरासाठी, विशेषत: गरम हवामानात, एक चांगला पर्याय आहे.

तीळ तेल: तीळ तेल त्याच्या तापमानवाढीच्या प्रभावासाठी ओळखले जाते. पारंपारिक पद्धतींमध्ये, ते सांधे आणि स्नायूंभोवती कडकपणा कमी करण्यास आणि रक्त परिसंचरण वाढविण्याशी संबंधित आहे. नाभीवर लावल्यास, ते पोटाच्या भागात आराम देऊ शकते, विशेषत हिवाळ्याच्या दिवसांत. तीळ तेल वापरण्यापूर्वी तेल थोडेसे गरम केल्याने आराम आणि शोषण सुधारते.

बदाम तेल: बदाम तेल हलके, सौम्य आणि व्हिटॅमिन ई ने समृद्ध आहे. ते संवेदनशील त्वचेसाठी आणि ज्यांना खाज सुटण्याची किंवा लालसरपणा होण्याची शक्यता असते त्यांच्यासाठी योग्य आहे. नाभीभोवती नियमित वापरल्याने त्वचा मऊ राहण्यास मदत होते आणि कालांतराने जुन्या स्ट्रेच मार्क्सचे स्वरूप सुधारू शकते.

मोहरीचे तेल: मोहरीचे तेल उबदारपणा निर्माण करते आणि त्वचेला रक्त प्रवाह वाढवते. काही लोक पोटात पेटके किंवा जडपणा येण्यासाठी ते वापरतात. मात्र, ते संवेदनशील त्वचेला त्रास देऊ शकते. यामुळे पॅच टेस्ट करणे आवश्यक आहे आणि ते नेहमी सौम्य तेलाने पातळ करून वापरावे. मोहरीचं तेल तुम्ही नियमित वापरणं टाळा हप्त्यातून तीन ते चार वेळा मोहरीचं तेल वापरणं योग्य आहे. तेलापेक्षा त्वचा स्वच्छ करणे जास्त महत्त्वाचे आहे. घाम किंवा बॅक्टेरिया अडकू नयेत म्हणून तेल लावण्यापूर्वी नाभी नेहमी धुवा. तसंच तेल लावतांना काही थेंब घाला जास्त तेल लावू नका. जास्त तेलाचा अर्थ चांगले परिणाम मिळणे असं नाही. परिणाम व्यक्तीनुसार बदलतात आणि त्याचे फायदे बहुतेकदा त्वचेच्या आराम आणि विश्रांतीशी संबंधित असतात. जर कोणतीही जळजळ, खाज सुटणे किंवा पुरळ उद्भवली तर ताबडतोब वापर बंद करा.

## संस्कृत सुभाषित

अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा ।
चिन्तातुराणां न सुखं न निद्रा क्षुधातुराणां न बलं न तेजः ।।

अर्थ – द्रव्यासाठी आतुर झालेला माणूस गुरू किंवा भावाला जाणत नाही, कामवासनेने उद्दीपित झालेल्या माणसाला भीती किंवा लज्जाही नसते. चिंतातुराला सुख नसते किंवा निद्राही नसते. भुकेने ग्रासलेल्या माणसाला बल किंवा तेज नसते.

## गुरु वचन

### मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | 5 | 7 | | 1 | |
| 8 | | | 1 | 9 | | 6 | | 5 |
| 1 | 4 | | 6 | | | | | |
| | | 9 | 8 | | | 5 | | 4 |
| | | | | | | | | |
| 5 | | 3 | | | 1 | 9 | | |
| | | | | | 5 | | 4 | 2 |
| 9 | | 1 | | 2 | 8 | | | 7 |
| | 2 | | 7 | 6 | | 1 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १२९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 6 | 1 | 3 | 7 | 5 | 8 | 9 |
| 9 | 7 | 5 | 2 | 8 | 4 | 3 | 6 | 1 |
| 1 | 3 | 8 | 9 | 5 | 6 | 4 | 2 | 7 |
| 3 | 6 | 9 | 8 | 4 | 5 | 7 | 1 | 2 |
| 7 | 4 | 1 | 6 | 9 | 2 | 8 | 3 | 5 |
| 5 | 8 | 2 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 |
| 2 | 9 | 4 | 7 | 6 | 3 | 1 | 5 | 8 |
| 8 | 1 | 3 | 5 | 2 | 9 | 6 | 7 | 4 |
| 6 | 5 | 7 | 4 | 1 | 8 | 2 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४७८ – इटलीतील पाझींनी फ्लोरेन्समध्ये चर्चमधील रविवारच्या सामूहिक प्रार्थने दरम्यान लॉरेन्झो दि मेदिची वर हल्ला केला. लॉरेन्झोचा भाउ ज्युलियानी मृत्युमुखी पडला.
- १६०७ – इंग्लंडचे काही वसाहती केप हेन्री, व्हर्जिनीया येथे पोचले. यांनी पुढे जेम्सटाउन शहर वसवले.
- १८०२ – नेपोलियन बोनापार्टने फ्रेंच क्रांतीत देशाबाहेर पळून गेलेल्या जहागिरदारांना माफी जाहीर केली व परत फ्रांसमध्ये बोलावले.

### राष्ट्रीय

- १९०३ – बॅरिस्टर मोहनदास गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेत वकिली व्यवसाय सुरू केला. तसेच ब्रिटीश इंडियन असोसिएशनची स्थापना केली.
- १९५६ – मध्य प्रदेशातील नेपानगर कागद कारखान्याचे पं. जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते उद्घाटन.
- १९७५– सिक्कीमला स्वतंत्र राज्याचा दर्जा.

### जन्म

- १२१ – मार्कस ऑरेलियस, रोमन स्राटाचा जन्म.
- १६४८ – पेद्रो दुसरा, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म
- १८९४ – रुडॉल्फ हेस, नाझी अधिकाऱ्याचा जन्म.
- १८९५ – पंजाबी लेखक गुरुबक्षसिंग यांचा जन्म.
- १९०० – चार्ल्स रिश्टर, अमेरिकन भूशास्त्रज्ञाचा जन्म.
- १९१७ – आय.एम.पै, अमेरिकन स्थापत्यविशारद याचा जन्म.
- १९६३ – जेट ली, चीनी अभिनेताचा जन्म.

### निधन

- ११९२ – गो-शिराकावा, जपानी स्राटाचे निधन.
- १४८९ – अशिकागा योशिहिसा, जपानी शोगनचे निधन.

## उपदेशकथा

### उंटाची दोरी !

एकदा एक अरब व्यापारी शंभर उंटांचा तांडा घेऊन चालला होता.दिवस मावळताना तो एका गावात आला. गावातल्या मशिदीत एक फकीर राहत होता. व्यापारी त्याच्याकडे गेला. नमस्कार करून म्हणाला,'मशिदीबाहेर मी माझे उंट बांधले आहेत.पण एका उंटाची दोरी व खुंटी वाटेत गहाळ झाली आहे.कृपया मला एक दोरी व खुंटी द्या !' त्यावर फकीर म्हणाला,'बांध रे तसाच बांध उंट!' व्यापारी पुन्हा म्हणाला ,'अहो,दोरी आणि खुंटी नाही.मग कसा बांधू?' यावर फकिर म्हणाला, 'चल मी बांधून दाखवतो उंट!' फकिर उंटाजवळ गेला.त्याच्याशेजारी खुंटी ठोकण्याचे नाटक केले.खुंतीला एक काल्पनिक दोरी बांधल्यासारखे केले आअणी दोरीची गाठ उंताच्या गळ्याला घट्ट बांधल्याचे नाटक केले. उंतावर एक थाप टाकली. आंइ आश्चर्य म्हणजे उंट खाली बसला. रात्रभर हलला नाही. होता मोकळाच पण हलला नाही. सकाळी अरब जायला निघाला सगळे उंट उभे राहिले.पण हा उंट उठेचना. अरबाने फकिराला बोलावले.फकिर म्हणाला,'तसा कसा उठेल तो? त्याची दोरी सोडायला हवी!'असे म्हणून त्याने उंटाची दोरी सोडल्याचे,खूंटी उपटल्याचे नाटक केले. उंटह्गी लगेच उठला आणि अंग झटकून चालू लागला.

कथा उपदेश : जे सवयीचे गुलाम असतात,ते स्वातंत्र्य गमावतात !



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:मघा २०:२६:५५ |
| २६ एप्रिल २०२६ | योग:वृद्धि २२:२७:२१ |
| रविवार | करण:गर १८:०७:१३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज |
| वैशाख शके | ३०:०८:०९+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मेष |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:सिंह |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– वैशाख | मुस्लिम मास – जिल्काद |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – ८ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:दशमी १८:०७:१३ | कालभैरव यात्रा– |

## : SMS :

Ab jab gira baadal,
teri yaad ai,
Jhoom ke barsa
saawan, teri yaad ai,
Bheega main, lekin
phir bhi teri yaad ai,
Kiyun na aey
teri yaad?
Tune jo chhatri ab
tak nahi lautai...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.९ | २६.१ |
| अहमदनगर | ३७.७ | २५.२ |
| अकोला | ४०.९ | २८.१ |
| अमरावती | ३९.४ | २८.१ |
| बीड | ४३.२ | ३१ |
| भंडारा | ४१.३ | २९.३ |
| बुलढाणा | ४१.३ | २४.९ |
| चंद्रपूर | ४२.९ | ३० |
| चेन्नई | ४३ | ३२.८ |
| नवी दिल्ली | ४१ | २७.४ |
| धुळे | ३९.४ | २५.५ |
| गोंदिया | ३९.९ | २८.१ |
| जळगाव | ४०.९ | २८.४ |
| कोल्हापूर | ३७.६ | २४.७ |
| लातूर | ३६.९ | २५.१ |
| मुंबई | ४२.२ | ३२.१ |
| नागपूर | ४०.५ | २९.६ |
| नांदेड | ३९.७ | २८ |
| नंदूरबार | ३८.१ | २७.६ |
| नाशिक | ३७.३ | २४.४ |
| पुणे | ३५.७ | २४.८ |
| पंढरपूर | ३८.७ | २५.७ |
| सातारा | ३७.७ | २२.२ |
| सांगली | ३८.७ | २५.५ |
| सोलापूर | ३९.३ | २६.३ |
| वर्धा | ४०.९ | २९.६ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** बेकारांना नोकरीच्या सुसंधी लाभतील. कार्यक्षेत्रातून प्रशिक्षणासाठी आपली निवड होईल.

**तुळ :** अशी खरेदी केली जाईल. आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्विकाराल.

**वृषभ :** प्रतिष्ठीत व्यक्तीच्या ओळखीतून कामे मार्गी लागतील.मेहनती वृत्ती आणि उत्तम बुद्धीमत्ता या त्रिसूत्रीच्या जोरावर मोठी मजल माराल.

**वृश्चिक :** प्रतिष्ठीत व्यक्तीच्या ओळखीतून कामे मार्गी लागतील. एखाद्या संघटनेचे नेतृत्व कराल एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्विकाराल.

**मिथुन :** परदेशातील भावंडांशी सल्लामसलत करुन महत्वाचे निर्णय घेतले जातील. विरोधकांना आपली मते पटवून द्याल.

**धनु :** व्यवसाय उद्योगासाठी कर्ज काढावे लागेल. कर्ज मंजूर होईल. मेहनती वृत्ती आणि उत्तम बुद्धीमत्ता या त्रिसूत्रीच्या जोरावर मोठी मजल माराल.

**कर्क :** आपल्या वाक्चातुर्यामुळे सभोवतालच्या व्यक्तींचे मने जिंकून घ्याल. आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास होणाऱ्या घटना घडतील.

**मकर :** उत्तरार्धात उधारी उसनवारी वसूल होईल. काळ, काम आणि वेग या त्रिसूत्रिचा वापर वेगवान पथावरुन वाटचाल घडवेल.


**सिंह :** जुने व्यवसायीत येणी वसूल होतील. व्यवसायातील आत्मविश्वास व कामाचा वेग वाढेल. भावंडांशी सुसंवाद साधाल. शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** अवास्तव साहस कटाक्षाने टाळावे. आपल्या बोलण्याने समोरची व्यक्ती दुखावली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**कन्या :** नवनवीन उपक्रम राबविण्यात यशस्वी व्हाल. परदेशी संस्थांशी व्यावसायिक संबंध सुधारतील. सामाजिक प्रतिष्ठा उचावेल.

**मीन :** भविष्यकाळाच्या दृष्टीने मोठयाप्रमाणावर व्यावसायिक गुंतवणूक करता येईल. व्यवसाय उद्योगात नवनवीन प्रकल्प राबविले जातील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १३०



**आडवे शब्द**

१. अतिशय कृपण
५. सत्त्व
७. शंकराचे आयुध
९. पृथ्वी
११. पलीकडे
१२. दरवाजा
१३. मुद्रणालय
१४. वार्ता, खबर
१६. बारा
१९. अशक्त
२०. मलीन
२१. समंजस
२५. श्रीमंत
२७. किरीट
२८. तळपायाचा कडक भाग
३०. वाद्य
३२. दुधाचा हा पदार्थ पंजाबी भाज्यात वापरतात
३४. मल्ल
३६. भावनाप्रधान
३८. खळगा
४०. फुलांचा गुच्छ
४१. विष्णूचे वाहन
४२. सावित्रीचा पती
४४. दडपण
४५. शरीरातून आरपार जाणारे किरण– यांच्याद्वारे वैद्यकीय तपासणी करतात
४६. चोप
४७. वाफेवर अन्न शिजवण्याचे पात्र
४८. विवाहितेच्या पतीचे घर
५०. रुढी
५१. शंकराचा स्वभाव
५२. जीवघेणा विळखा
५५. वीज
५६. घट्ट
५७. राज्यसुख
५८. लोणच्यातील आंबट फळ
५९. धीर, बळ, ताकद
६१. सावध
६२. साधना
६४. याच्यापेक्षा मोती जड नसावा!
६५. दोष, उणीव
६७. नित्य
६९. लग्नमुंजीचा गाजावाजा करणारी उपद्रवी प्रथा
७१. पूर्वी कधी न झालेले
७२. विष्णूचा एक अवतार
७४. चिन्ह
७६. अवाक्षर
७७. पदवी
७८. उद्यान
७९. सेतू
८०. भाकरीबरोबर हा मस्त!
८१. अग्नी
८२. घृत
८३. हजामत, मुंडण

**उभे शब्द**

१. दुर्दैवी
२. नवरदेव
३. कैरीचे आंबटगोड तोंडीलावणे
४. माळजमीन
५. चहाचा पेला
६. ---- बाईंडर– तेंडुलकरांचे गाजलेले नाटक
८. पराक्रमी
९. रमलेला
१०. समाविष्ट, मिळालेला
१३. चांगले
१४. तीर
१५. कंजूष
१७. बाळाचे अंगडे
१८. ढळलेला
१९. दुध
२१. बरोबरी
२२. निबर, राठ
२३. वीज
२४. उमलणारी कळी
२५. तराजू
२६. वाचा
२९. चंचल लक्ष्मी
३०. सभ्य
३१. ताकद, ३३. दात
३५. गाव
३६. कृश
३७. सूर्य
३९. दक्षता
४०. उडी
४३. राबता, शेतजमीन
४४. नोकर
४६. डोके
४८. निवृत्तीचे वय
४९. नाशवंत
५०. सूर्योदयाची वेळ
५१. बावळट
५३. तृण
५४. खोटे, भ्रामक
५६. खटला
५७. दानव
५८. कितीतरी
६०. कानातील अलंकार
६३. मारुतीचा पिता
६४. आप्त
६६. आंब्याची उंची जात
६८. अरण्यातील अग्नी
७०. उत्सवाचे दिवस
७३. माज
७५. झुपकेदार पालेभाजी
७७. वर्ष
७८. वडील

**जम्बो शब्दकोडे क्र. १२८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.गावभवानी ५.कमाई ८.सह ९.वनमाळी ११.गवगवा १२.वाचा १४.रज १५.सुळसुळाट १७.लय १८.पु.ल.देशपांडे २२.तीर २३.सुस्कारा २५.सुर २६.आवाज २७.वाढ २८.सराईत ३०.नवरी ३२.खेळ ३३.नभ ३४.गाभारा ३७.लीला ३८.सत्य ४०.रीतसर ४२.जीवन ४३.आळ ४४.सशक्त ४५.वासव ४७.ताठर ४९.रजक ५०.खजूर ५२.ऋण ५३.पसार ५५.बोरे ५६.जाग ५९.मका ६०.वाळू ६२.दीप ६४.तलवार ६७.जाळ ६८.खळगा ७०.रिक्त ७१.वीर ७३.मिथुन ७४.हाल ७५.वहाण ७६.गवई ७७.कीचक ७९.चाक ८०.यम ८२.याग ८३.ऊर ८४.विपरित ८५.गळ ८६.सारण

उभे उत्तर : १.गाढवापुढे वाचली गीता २.भला ३.नीव ४.नमाज ६.मावळती ७.वावटळ ८.सवालजवाब १०.नरडे ११.गळा १२अ. चाल १३.वंश १६.सुरसुरी १९.देर २०.पांढरा २१. मस्का २३.सुत २४.रानभरी २८.सळसळ २९.ईश ३१. मुका ३४.गारवा ३५.राजीव ३६.जनगणना ३९.बेशक ४१.तराजू ४३.आरसा ४४.सजग ४६.सगा ४८.ठपका ५०.खरेदी ५१.रजा ५४.रवाळ ५७.गत ५८.पावा ५९.मनमिळाऊ ६१.घोळ ६३.परणिय ६५.लढवय्या ६६.रवि ६७.जानकी ६८.बल ६९.गावकरी ७२.रणांगण ७४.हाक ७८.चर्या ७९.चाप ८१.मग ८२.यार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### हमी देऊनही नागरिकांना पाणीपुरवठा न करणाऱ्या बिल्डरांकडून टँकरचे पैसे घ्या !

पुणे (दैनिक संध्या) : गृहप्रकल्पांना मंजुरी घेताना महापालिकेचा पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र भरून देणारे; पण नंतर ती हमी न पाळणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवरून पुणे महापालिकेची झालेली सर्वसाधारण सभा गाजली. पाणीपुरवठा न करणाऱ्या व्यावसायिकांकडून टँकरचे शुल्क वसूल करावे, यासह अनेक मागण्या, तक्रारी सभेत मांडण्यात आल्या. गृहप्रकल्पांना मंजुरी घेताना महापालिकेचा पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र बांधकाम व्यावसायिक भरून देतात. इमारतीला महापालिकेची मान्यता असल्याने नागरिक विश्वासाने गृहप्रकल्पांमध्ये सदनिका घेतात. मात्र, त्यानंतर बांधकाम व्यावसायिक पाणीपुरवठ्याची हमी विसरतात. पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रत्येक महिन्याला सोसायटीधारकांना तीन ते चार लाख रुपये टँकरसाठी खर्च करावे लागतात. हमीपत्र देऊनही पाणीपुरवठा न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांकडून टँकरचे शुल्क वसूल करावे, अशी मागणी करून सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय सभासदांनी प्रशासनाला धारेवर धरले. ‘ज्या सोसायटींना महापालिका पाणी देण्यास अपयशी ठरत आहे, अशा सोसायट्यांना पाणीपट्टीत तसेच मिळकतकरात सूट देण्याबाबतचे धोरण तयार करून सर्वसाधारण सभेत ठेवले जाईल,’ असे आश्वासन महापालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेत दिले. पुणे महापालिकेच्या ‘समान पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होत नाही. पाण्याच्या टाका बांधलेल्या असतानाही पुरसे पाणी येत नाही. पूर्ण दाबाने पाणी कधी मिळणार,’ अशी विचारणा करत महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपसह विरोधी पक्षांच्या सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारला.‘पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र, शपथपथ दिलेल्या किती बांधकाम व्यावसायिकांवर महापालिकेने कारवाई केली आहे,’ असा प्रश्न नगरसेवक सचिन दोडके यांनी सभागृहात विचारला. दोडके म्हणाले, ‘महापालिकेचे पाणी पोहोचू शकत नाही, तोपर्यंत संबंधित बिल्डर स्वखर्चाने पाणी देण्याचे शपथपत्र महापालिकेस देतो. दरम्यान, ताबा मिळाल्यानंतर पाणी पुरविण्याबाबत बिल्डर हात झटकतात.

### पोलीस चौकीत गोंधळ; पोलीस शिपायाला धक्काबुक्की; तिघांविरुद्ध गुन्हा

पुणे (दैनिक संध्या) : दोन गटातील भांडणे सोडविण्यासाठी गेलेल्या पोलीस शिपायाला धक्काबुक्की करुन पोलीस चौकीत गोंधळ घातल्याची घटना वडगाव शेरी भागात घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आरोपींविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस शिपाई अभिजित आल्हाट (वय २७) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव शेरी भागातील बदामी चौकात २३ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास दोन गटात वाद सुरू होते. दोन गटात भांडणे सुरू असल्याची माहिती पोलीस शिपाई आल्हाट यांना मिळाली. त्यानंतर ते भांडणे सोडविण्यासाठी तेथे गेले. तेव्हा आरोपींनी त्यांना धक्काबुक्की केली. त्यानंतर तिघांना ताब्यात घेऊन वडगाव शेरीतील महात्मा फुले चौकीत नेले. तेव्हा आरोपींनी पोलीस चौकीत गोंधळ घालून स्वत:ला दुखापत करुन घेण्याचा प्रयत्न केला. पोलीस चौकीतील साहित्याची तोडफोड आरोपींनी केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीलेश बोराडे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक भरत बोराडे तपास करत आहेत.

### ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी 17 लाखांची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याची बतावणी करुन औंध भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी एक कोटी १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ६० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक १३ मार्च ते २२ एप्रिल या कालावधीत घडली आहे. सायबर चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. समाज माध्यमातील संपर्क यंत्रणेचा वापर करुन चोरट्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला. चोरट्यांनी पोलिसांसारखा गणवेश परिधान केला होता. एका दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याची बतावणी चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाकडे केली. ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून दहशतवाद्यांच्या खात्यात पैसे हस्तांतरित झाल्याचे चोरट्यांनी सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी अटकेची भीती दाखवून ज्येष्ठाकडे अटक टाळण्यासाठी पैशांची मागणी केली. घाबरलेल्या ज्येष्ठाने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी एक कोटी १७ लाख ८७ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत. केंद्रीय तपास संस्थांच्या नावे कारवाईची भीती दाखवून गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांची विशेषत : ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्याच्या घटना वाढल्या आहेत. नागरिकांनी चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डेक्कन जिमखाना भागात दोन ठिकाणी आग; अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात

पुणे (दैनिक संध्या) : डेक्कन जिमखाना भागात मध्यरात्री दोन ठिकाणी आग लागण्याची घटना घडली. नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील हॉटेल रुपालीजवळ कपड्यांच्या साठ्याला आग लागल्याची घटना घडली. डेक्कन जिमखाना परिसरातील एका मॉलच्या परिसरात पहाटे आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील (फर्ग्युसन रस्ता) हॉटेल रुपालीजवळील गल्लीत कपडे विक्रीची दुकाने आहे. या भागात कपडे विक्रेते रस्त्यावर विक्री करतात. या भागातील एका पत्र्याच्या शेडमध्ये कपड्यांचा साठा ठेवण्यात आला होता. मध्यरात्री सव्वाबाराच्या सुमारास पत्र्याच्या शेडमध्ये आग लागली. कपड्यांनी पेट घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर धूर झाला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या एरंडवणे केंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन अधिकारी राजेश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ‘जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाल नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही’ अशी माहिती अग्निशमन अधिकारी राजेश जगताप यांनी दिली. त्यानंतर डेक्कन जिमखाना भागातील एका मॉलच्या आवारात पहाटे चारच्या सुमारास आग लागली. मॉलच्या आवारात ठेवलेल्या वस्तू, तसेच सिलिंगला आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करुन अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली. वारजे भागात शुक्रवारी मध्यरात्री एका सोसायटीतील दुकानांना आग लागल्याची घटना घडली होती. २४ तासात शहरात तीन ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या.

# आशियातील पहिल्या युनेस्को अध्यासनाचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी आज आज 'लिंगभाव समावेशन आणि कौशल्य विकास' या विषयावरील युनेस्को अध्यासनाचे उद्घाटन केले. सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एसएसपीयू), पुणे येथे युनेस्कोच्या सहकार्याने आयोजित 'विमेन लीडिंग द फ्युचर ऑफ वर्क' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा हा एक भाग होता. श्री. चौधरी यांच्या हस्ते या अध्यासनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, नॉर्वेच्या महावाणिज्य दूत मोनिका नागेलगार्ड, एसएसपीयूच्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




केंद्रीय मंत्री श्री चौधरी म्हणाले, भारताच्या विकासाची दिशा केवळ त्याच्या व्याप्तीवरूनच नव्हे, तर आपण आपल्या लोकांना किती समावेशकपणे सक्षम करतो, यावरून निश्चित होईल. ते म्हणाले की, युनेस्को चेअर सारखे उपक्रम हे सुनिश्चित करतात की, सेमीकंडक्टर्स, प्रगत उत्पादन आणि आधुनिक काळातील तंत्रज्ञान यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये महिला आघाडीवर असतील. जेव्हा कौशल्य विकास हा उद्योगांच्या मागणीनुसार असतो, आणि समतेच्या तत्त्वावर आधारित असतो, तेव्हा तो आर्थिक प्रगती आणि सामाजिक परिवर्तन या दोन्ही गोष्टींना चालना देणारा शक्तिशाली घटक ठरतो, असे त्यांनी नमूद केले.

श्रीमती तटकरे यांनी वंचित समाजातील महिलांपर्यंत पोहोचण्याच्या आणि त्यांना खऱ्या संधी मिळवून देणाऱ्या कौशल्यांनी सक्षम करण्याच्या उपक्रमाची प्रशंसा केली. महिलांमध्ये आत्मविश्वास, स्वातंत्र्य आणि दीर्घकालीन सक्षमीकरण निर्माण करण्यासाठी असे उपक्रम महत्वाचे आहेत, असे त्या म्हणाल्या.

'विमेन लीडिंग द फ्युचर ऑफ वर्क' या विषयावरील या आंतरराष्ट्रीय परिषदेत, उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये आणि भविष्यातील रोजगाराच्या भूमिकांमध्ये महिलांचा सहभाग बळकट करण्यावर विचारमंथन करण्यासाठी जागतिक संस्था, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील धुरीण आणि शिक्षणतज्ज्ञ यांना एकत्र आले. ‘युनेस्को चेअर’ चा यशस्वी शुभारंभ आणि ही आंतरराष्ट्रीय परिषद, भारताला कौशल्य विकास आणि समावेशक मनुष्यबल परिवर्तनामध्ये जागतिक नेतृत्व म्हणून प्रस्थापित करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे.

या परिषदेत संरक्षण तंत्रज्ञान, रोबोटिक्स, इंडस्ट्री 4.0, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि जागतिक क्षमता केंद्रे यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमधील रोजगाराच्या भविष्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विशिष्ट संकल्पनांचा समावेश होता. या परिषदेत विविध कंपन्यांमधील 40 हून अधिक प्रतिष्ठित उद्योजकांनी प्रमुख वक्ते आणि पॅनेल सदस्य म्हणून आपले योगदान दिले. या परिषदेत पुढील जागतिक तज्ज्ञांची प्रमुख भाषणे होती: मेरी ओव्हरिंग्टन, व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त (दक्षिण आशिया), गॅब्रिएल बोर्डाडो, कौशल्य तज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, सोलेदाद पॅटिनो, युनेस्को ग्लोबल स्किल्स अकादमी, पॅरिस, आणि प्रिसिला वांजिकू गटोनी, युनेस्को - यूएनईव्हीओसी, जर्मनी, यांच्यासह आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील इतर मान्यवरांनी सहभाग घेतला.

## पुणे महापालिकेतील सभागृह नेते ‘हुकुमशाही’ पद्धतीने कारभार करतात !

पुणे (दै. संध्या)

‘महापालिकेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज करताना लोकशाहीच्या मूल्यांना हरताळ फासला जात आहे. सभागृहाचे कामकाज योग्य पद्धतीने चालविण्याची जबाबदारी असणारे सभागृहनेते ‘हुकुमशाही’ पद्धतीने कारभार करीत आहेत,’ असा आरोप विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी गणेश बीडकर यांच्यावर करत त्यांना खडे बोल सुनावले.

महापालिकेची सर्वसाधारण सभा पार पडली. ‘सर्वसाधारण सभेतच सभासदांना अनेक गोष्टींवर चर्चा करता येते. आपली मते मांडता येतात. प्रशासनातील अधिकाऱ्यांना जाब विचारता येतो. सर्वसाधारण सभेत अनेक सभासद नवीन असून त्यांना बोलण्याची संधी मिळावी, यासाठी सभा एका दिवसात न संपविता दोन टप्प्यांत घ्यावी,’ अशी मागणी विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेससह, काँग्रेस आणि इतर पक्षांच्या नेत्यांनी महापौर मंजूषा नागपुरे यांची भेट घेऊन केली होती.

सर्वसाधारण सभेची कार्यपत्रिका संपण्यासाठी दोन विषय शिल्लक असताना विरोधकांनी विषय तहकुबी मांडून सभा पुढे सुरू ठेवण्याची मागणी केली. मात्र, सभागृह नेते बीडकर यांनी ही तहकुबी फेटाळली. सर्वपक्षीय सभासदांच्या हितासाठी ही तहकुबी मान्य करावी, अशी आग्रही मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात केली. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही.

## मातंग समाज उपवर्गीकरणासाठी पुण्यात एकजूट

### आमदार अमित गोरखे यांना पाठिंबा : सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी लढा तीव्र

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मातंग समाजात मोठी चळवळ उभी राहत आहे. या पार्श्वभूमीवर मातंग समाजाचे नेते आणि कार्यकर्त्यांनी आमदार अमित गोरखे यांची भेट घेऊन त्यांना ठाम पाठिंबा दर्शविला.

या भेटीदरम्यान पुणे शहर जिल्हा मातंग समाज उपवर्गीकरणाच्या लढ्यात पूर्ण ताकदीने उभा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. समाजातील सर्व स्तरांतील नेते, कार्यकर्ते आणि तरुणांनी एकत्र येत उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.



मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते शंकर भाऊ तडाखे आणि पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक भाऊ कसबे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, “सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा समाजासाठी न्याय मिळवून देणारा आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी तातडीने झाली पाहिजे. यासाठी आम्ही सर्वजण एकत्र आलो असून हा लढा शेवटपर्यंत सुरू राहील.”

त्यांनी पुढे सांगितले की, उपवर्गीकरणामुळे समाजातील वंचित घटकांना न्याय मिळणार असून शिक्षण, नोकरी आणि सामाजिक संधींमध्ये समतोल साधला जाईल. त्यामुळे शासनाने कोणतीही दिरंगाई न करता निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही करण्यात आली.

दरम्यान, या चळवळीमुळे मातंग समाजात नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात राज्यभर आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तकावर बंदीसाठी हिंदुत्वनिष्ठांचे तीव्र आंदोलन!

पुणे (दै. संध्या)

कॉ. गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करून इतिहासाचे विकृतीकरण केल्याचा आरोप करत हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने कोल्हापुरातील शिवाजी चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली.




या पुस्तकाद्वारे महाराजांचा जाज्वल्य इतिहास लोकांसमोर विकृत करून मांडला आहे. चुकीचा वा धार्मिक भावना दुखावणारा इतिहास मांडणाऱ्या या पुस्तकावर तात्काळ बंदी आणावी या मागणीसाठी समस्त हिंदुत्वनिष्ठांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर केले. निवेदन स्वीकारल्यावर शहर पोलीस उपअधीक्षक प्रिया पाटील व अप्पर पोलीस अधीक्षक धीरजकुमार बच्चू यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. ‘शिवाजी कोण होता ?’ या पुस्तकात ‘भवानी देवीने छत्रपती शिवाजी महाराज यांना तलवार दिलीच नाही’, तसेच “हिंदु धर्मावरील निष्ठेमुळे शिवाजीला यश प्राप्त झाले, हे खरे नाही” असे दावे करण्यात आले असून, ते ऐतिहासिक पुराव्यांच्या पूर्णतः विपरीत आहे. तसेच ‘हिंदवी स्वराज्य’ ही महाराजांची स्वतःची इच्छा होती, हा त्यांचा मूलभूत विचारही पुस्तकात नाकारण्यात आला आहे. हा प्रकार म्हणजे हिंदू अस्मितेचा पाया असलेल्या महापुरुषांचे ‘वैचारिक खच्चीकरण’ करण्याचा एक सुनियोजित कट आहे. राजमाता जिजाबाई यांनी महाराजांना रामायण-महाभारत आदी धर्मग्रंथांतील कथा सांगून त्यांना मोघलांच्या विरोधात लढण्यासाठी सिद्ध केले. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी पाच पातशाह्या बुडवल्या. मोघलांना यमसदनात धाडले. अनेक ठिकाणी मंदिरे उभारली. ते हिंदूंचे राजे झाले. असे असतांना या पुस्तकाद्वारे त्यांची पूर्णत: चुकीची प्रतिमा निर्माण केली गेली आहे.

## सिंहगड रस्त्यावर ‘आरएमसी’ प्रकल्पांचा धुराळा

पुणे (दै. संध्या)

‘सिंहगड रस्त्यावरील वडगाव खुर्द परिसरात रेडिमिक्स सिमेंट (आरएमसी) प्रकल्पामुळे प्रदूषण होत असून, परिसरातील रहिवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. हा प्रकल्प महापालिकेच्या हद्दीबाहेर हलवा, त्यानंतर आरएमसी प्रकल्पांसाठीची नियमावली तयार करण्यात यावी, नागरी वस्त्यांजवळ आरएमसी प्रकल्प नको,’ अशी मागणी सिंहगड रस्ता परिसरातील रहिवाशांनी शुक्रवारी केली. प्रशासनाने कारवाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा सिंहगड रस्ता ‘आरएमसी’ प्रकल्पविरोधी कृती समितीने दिला आहे. समितीचे राजेंद्र पाटील, गणेश पिंपळे, लोकेश भावेकर, ॲड. प्रीतेश चांडगे, आनंद खळदकर, राहुल मांडे, सुयोग केळकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

वडगाव खुर्द येथील दत्तकृष्णाई मंगल कार्यालय ते प्रयेजा सिटी मधुकोष सोसायटी आणि परिसरात अनधिकृत आरएमसी प्रकल्प सुरू आहेत. या परिसरात प्रयेजा सिटी, प्रयेजा पुरम, आर्यन रेसिडेन्सी या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये हजारहून अधिक नागरिक राहतात. शाळेच्या निमित्ताने मुलांचा वावरही मोठ्या प्रमाणात असतो. या प्रकल्पामुळे परिसरातील सर्व नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. प्रकल्पातून बाहेर पडणारी सिमेंटची धूळ हवेत मिसळून थेट परिसरातील घरांमध्ये, लहान-ज्येष्ठांच्या डोळ्यांत आणि तोंडात जाते.

# आषाढी वारीसाठी पालखी मार्गावरील सोयीसुविधांचा आढावा

### पालखी सोहळ्याच्या सुरक्षिततेसाठी 'डीवायएसपी' ची नोडल अधिकारी म्हणून होणार नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर देहू येथून निघणाऱ्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी, आळंदी येथून निघणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तसेच सासवड येथून प्रस्थान करणाऱ्या संत सोपानदेव पालखी सोहळ्यांच्या मार्गावरील रस्ते, मुक्कामस्थळे व सोयीसुविधांबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज आढावा घेतला. वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापूर्वी २१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी कितपत झाली याचाही सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.



संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील ईनामदार वाडा परिसरातील रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. देहू कॅन्टोन्मेंट हद्दीतील खराब रस्त्याची दुरुस्ती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत, कॅन्टोन्मेंट बोर्डाची नाहरकत घेऊन तातडीने करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले. आकुर्डी येथील पालखी मुक्कामासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे तसेच तेथील रस्ता व मेट्रोची कामे पालखी आगमनापूर्वी पूर्ण होतील याची खात्री करण्यासही सांगण्यात आले.

लोणी काळभोर येथील पालखी मुक्कामाची तयारी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येणार असून, जर्मन हँगर, पाणी टँकर व स्वच्छता व्यवस्था गतवर्षीपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पालखी तळावरील व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे पार पाडावी, असेही निर्देश देण्यात आले.

निरा नदीत पालखी आगमनाच्या दोन दिवस आधी पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाला देण्यात आल्या. संत सोपानदेव पालखी सोहळ्यासाठी पोलीस बंदोबस्त, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे अधिक नियोजनबद्ध नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

आळंदी येथे नवीन भक्ती सोपान पुलाची उंची ‘स्काय वॉक’प्रमाणे वाढविणे तसेच दर्शन बारीसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. आळंदी ते पिंपरी-चिंचवड हद्दीपर्यंतच्या सुमारे ७०० मीटर रस्त्यापैकी केवळ १०० मीटरचे रुंदीकरणाचे काम शिल्लक असून ते लवकर पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित यंत्रणेकडून देण्यात आली.

दिवे घाट परिसरात वारीदरम्यान बॅरेकेटिंग व रस्त्यालगत विजेची सोय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज संस्थानांना प्रत्येकी एक स्वतंत्र रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आळंदी येथील दर्शनबारी परिसरात सुरक्षिततेसाठी सुमारे १८० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सासवड येथील भुजबळ हॉटेल परिसरातील खड्डा भरण्याचे काम प्रगतिपथावर असून ते लवकर पूर्ण होणार असल्याने पालखी मार्ग सुरळीत होणार असल्याचे सांगण्यात आले.

पालखी मार्गावरील सुरक्षितता व वाहतूक व्यवस्थापनासाठी समन्वय साधण्यासाठी डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, “पालखी सोहळा हा जगातील सर्वात शिस्तबद्ध धार्मिक सोहळा असून रस्ते, पाणीपुरवठा व आरोग्य सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहता कामा नये. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना उत्तम सुविधा द्याव्यात.”

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते, संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी तसेच देहू, आळंदी व संत सोपानदेव संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भारताचा विकासदर बाह्य घटकांवर अवलंबून नाही : संचालक सतीश मराठे

पुणे (दैनिक संध्या) : मध्यपूर्वेत तणाव असूनही भारताची अर्थव्यवस्था स्थिर आहे. काळजीचे काहीही कारण नाही. इंधनाच्या किमतींमुळे होणारी महागाई ही 'इम्पोर्टेड इन्फ्लेशन' आहे. ती फार वाढणार नाही. डॉलरच्या बदल्यातील घसरणीवरही चर्चा होते, पण जीडीपीच्या तुलनेत ही तूट फार मोठी नाही. ही तूट मागील २.५ वर्षांत १ % ते १.५ % दरम्यान होती आणि अनेक महिन्यांत ती सकारात्मकही होती. भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. भारताचा विकासदर बाह्य घटकांवर अवलंबून नाही, असे मत रिझर्व बँक ऑफ इंडिया सेंट्रल बोर्डचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले. आधार सोशल फाउंडेशन आणि प्रसेनजीत फडणवीस मित्र परिवार यांच्यावतीने बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल प्रसेनजीत फडणवीस यांचा सन्मान आणि अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात आला होता. डेक्कन येथील गोखले इन्स्टिट्यूट जवळील मानव विकास संस्था (सारथी) पुणे येथे सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र हिरेमठ, जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब, राज्य सह. निवडणूक प्राधिकरणाचे निवृत्त सह आयुक्त संजय खडके, आधार सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष दिलीप काळोखे यावेळी उपस्थित होते. सतीश मराठे म्हणाले, बँकिंग क्षेत्र जितके मोठे होईल तितकी देशाची प्रगती होणार आहे. अनेक भारतीय कंपन्या परदेशात गुंतवणूक करतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना आधार देण्यासाठी मजबूत भारतीय बँका आवश्यक आहेत. जगात ब्रिटिश, अमेरिकन, कोरियन, जपानी बँका त्यांच्या देशातील उद्योगांना मदत करतात. त्याचप्रमाणे भारतातही तसे व्हायला हवे. परदेशात व्यावसायिकांना सपोर्ट करायला आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय बँकांची गरज आहे. ते पुढे म्हणाले, राष्ट्रीयीकरणाच्या काळात, १९६९ मध्ये सुरू झालेल्या चळवळीबद्दल सांगायचे तर, ते फक्त राष्ट्रीयीकरण नव्हते, तर 'सरकारीकरण' होते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा मालकी हक्क हा सर्वात मोठा प्रश्न आहे. तो तसाच ठेवायचा की बदल करायचा, यावर मोठी चर्चा आवश्यक आहे.



### पाणी प्रश्नावर आमदार अमित गोरखे यांनी महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिले निवेदन

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराला भेडसावणारी पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी आणि भविष्यातील पाणीसाठा सुरक्षित करण्यासाठी आमदार अमित गोरखे यांनी पाऊल उचलले आहे. भामा आसखेड धरणातील साचलेला गाळ काढून धरणाची मूळ साठवण क्षमता वाढवण्यात यावी, यासाठी आमदार गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले होते. त्यांच्या मागणीची दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जिल्हा जलसंधारण विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे पत्र पाठवले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी आणि औद्योगिकीकरणासाठी भामा आसखेड धरण हा एक अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. या धरणातून शहराला दररोज सुमारे १६७ एमएलडी पाणीपुरवठा करण्याचा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने धरणाची उपयुक्त पाणी साठवण क्षमता लक्षणीयरीत्या घटली आहे. परिणामी, पावसाळ्यात धरण भरूनही प्रत्यक्ष पाणीसाठा कमी होत असल्याने शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरातील नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे होणारा त्रास लक्षात घेऊन आमदार अमित गोरखे यांनी २० एप्रिल २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले होते. शहराची वाढती औद्योगिक गरज आणि लोकसंख्या पाहता भामा आसखेड धरणातील गाळ काढणे ही काळाची गरज आहे. जर ही कार्यवाही तातडीने झाली नाही, तर भविष्यात पाणी संकट अधिक गंभीर होईल, असा इशारा आमदार अमित गोरखे यांनी दिला आहे.




### करुणा, प्रेम आणि सह-अस्तित्वाचा प्रेरणादायी उत्सव – मानव एकता दिवस

काळेवाडी (दैनिक संध्या) : हृदयात करुणा, प्रेम आणि एकात्मतेची दिव्य जाणीव जागृत झाली की, मनुष्य आपल्या संकुचित स्वार्थांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण सृष्टीच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनतो. परोपकार, करुणा आणि परमार्थ या उदात्त मूल्यांनी अधोरेखित झालेला हा दिवस उच्च मानवी मूल्यांची जाणीव अधोरेखित करणारा ठरला; 'मानवाने मानवावर प्रेम करावे, एकमेकांचे आधार बनावे' हा संदेश शब्दांच्या पलीकडे जाऊन जनमानसात ठळकपणे रुजला. 'मानव एकता दिवस' २४ एप्रिल रोजी युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, देशभरातील हजारो सत्संग केंद्रांवर हा दिवस श्रद्धा व समर्पण भावाने यशस्वीरीत्या पार पडला. हे केवळ एक आयोजन नव्हते, तर प्रेम, सद्भावना आणि निष्काम सेवेचे प्रभावी प्रतिबिंब म्हणून ते सर्वत्र उमटले. मानव एकता दिवसानिमित्त संत निरंकारी सत्संग भवन, काळेवाडी, पिंपरी येथे विशाल रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये यशवंतराव रुग्णालय रक्तपेढी, ससून रुग्णालय रक्तपेढी, तसेच संत निरंकारी रक्तपेढीच्या अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक आरोग्य तपासणी करून सुरक्षित, सुव्यवस्थित आणि प्रभावी पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. या उपक्रमातून ७१० युनिटचे संकलन करण्यात आले. संपूर्ण आयोजनात स्वच्छता, सतर्कता आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ जीवनदायी सेवापुरता मर्यादित न राहता मानवता, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे उच्च प्रतीक म्हणून समोर आला. या कार्यक्रमाला आमदार श्री.शंकर जगताप, महापौर श्री. रवीभाऊ लांडगे, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे आयुक्त श्री.विजय सूर्यवंशी त्याचबरोबर अनेक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून मिशनच्या कार्याचे कौतुक केले.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात

**लोणी-काळभोर (दै. संध्या) :**




एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त आयोजित राज्यस्तरीय आमंत्रित मुष्टीयुद्ध (बॉक्सिंग) स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

सदर स्पर्धा बँटमवेट, लाईटवेट, वेल्टरवेट, लाईट मिडलवेट, मिडलवेट, लाईट हेवीवेट, क्रूझरवेट आणि हेवीवेट अशा विविध वजन गटांत झाली. स्पर्धेचे उद्घाटन अर्जुन पुरस्कारप्राप्त मुष्टीयोद्धा कॅप्टन गोपाल देवांग तसेच ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कारप्राप्त मुष्टीयोद्धा मनोज पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र.कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, क्रीडा विभाग संचालक व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. पद्माकर फड, डॉ. अतुल पाटील आदी उपस्थित होते.

स्पर्धेअंती सर्व वजन गटांतील विजेत्यांना सुवर्णपदके व उपविजेत्यांना रौप्यपदकांसह तब्बल एक लाख रुपयांपेक्षा अधिकच्या पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

या स्पर्धेत राज्यातील युवा विकास मंच, मनोज पिंगळे क्रीडा अकादमी, नॉकआउट बॉक्सिंग अकादमी, मुंबई बॉक्सिंग अकादमी, स्टार बॉक्सिंग अकादमी, कोंढवा बॉक्सिंग अकादमी, खराळवाडी बॉक्सिंग अकादमी, के.डी. बॉक्सिंग अकादमी, बीएमएसए अकादमी, बीव्हीजीपी बॉक्सिंग अकादमी तसेच डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमी आदी नामांकित अकादमींच्या मुष्टीयोद्ध्यांनी सहभाग घेतला आणि निकराच्या लढती रंगवल्या.

स्पर्धेअंती मिडलवेट गटात (७० ते ७५ किलो) के.डी. बॉक्सिंग अकादमी मुंबईच्या मिथेश राठोड याला 'सर्वोत्कृष्ट बॉक्सर' तर हेवीवेट गटात (८५ ते ९० किलो) एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या आर्या औटी याला 'सर्वोत्कृष्ट चॅलेंजर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

## महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सौ. ममता प्रितम म्हात्रे सक्रिय

**उरण : (दै. संध्या) :**

पनवेल महानगरपालिका हद्दीत सामान्य कर्करोगांचे पूर्व-तपासणी, लवकर निदान, प्रतिबंध व जनजागृती कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्यात विशेष करार करण्यात आलेला आहे. या कराराअंतर्गत आरोग्य यंत्रणा बळकट करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व समुदाय स्तरावर कर्करोग तपासणी सेवा सक्षम करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई (प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी सर्व्हिसेस, खोपोली) व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने "सामान्य कर्करोगांचे प्रतिबंध, नियंत्रण व लवकर निदान" या विषयावर एएनएम व स्टाफ नर्सेससाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दोन टप्प्यांत यशस्वीरीत्या पार पडली. ही कार्यशाळा दिनांक २५ व २७ मार्च तसेच १६ व १७ एप्रिल २०२६ रोजी सिडको समाज केंद्र, कामोठे येथे आयोजित करण्यात आली होती. एकूण १२० नर्सेस व आरोग्य कर्मचाऱ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला. कार्यशाळेमध्ये स्तन, गर्भाशय मुख (सर्व्हिकल) व तोंडाचा (ओरल) कर्करोग यांचे प्रमाण, जोखमीचे घटक, लक्षणे, तपासणी पद्धती व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच एचपीव्ही डीएनए चाचणी, पॅप स्मीअर, VIA तपासणी यांचे प्रात्यक्षिक सत्र घेण्यात आले. स्तन स्वयं-परीक्षण, तोंडाच्या कर्करोग तपासणी, तंबाखू निर्मूलन समुपदेशन व जनजागृती यावरही भर देण्यात आला.

## सोनी सबच्या आगामी शो 'हस्तिनापुर के वीर' मध्ये चंदन आनंदने शकुनिच्या तीक्ष्ण बुद्धी आणि बहुपेडी व्यक्तिमत्त्वाला जिवंत केले आहे.

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



सोनी सब आपल्या नव्या भव्य अध्यायासह हस्तिनापुर के वीर सादर करत आहे. महाभारताच्या पांडव आणि कौरवांच्या अनकथित बालपणावर आधारित ही मालिका नाती, निष्ठा आणि नियती कशी आकार घेतात याचा शोध घेते. या कथेला धार देणारा महत्त्वाचा पैलू म्हणजे चंदन आनंदचा शकुनी एक असे पात्र ज्याची उपस्थिती शांतपणे घटनांचा प्रवाह बदलते, जगाला त्याचा मोठा खेळ दिसण्याआधीच चकित करणाऱ्या बहुपेडी भूमिकांसाठी ओळखला जाणारा चंदन, शकुनीसारख्या गुंतागुंतीच्या आणि अनपेक्षित व्यक्तिरेखेत पाऊल ठेवतो. शकुनी अत्यंत बुद्धिमान आणि निरीक्षक आहे. त्याला ठाऊक आहे की खरी ताकद फक्त सामर्थ्यात नसते, तर दृष्टिकोन आणि प्रभावात असते. तो दुर्योधनाच्या हक्काच्या भावनेला खाद्य पुरवतो, विद्यमान भावनांवर आधार घेत सूक्ष्मपणे विचारांना दिशा देतो. त्याचा विश्वास आहे की कथा कशी सांगितली जाते हे सत्यापेक्षा अधिक महत्त्वाचं असू शकतं. त्यामुळे त्याचा प्रभाव शक्तिशाली आणि धोकादायक ठरतो. भूमिकेबद्दल बोलताना चंदन आनंद म्हणतो, "जेव्हा मी शकुनीचे सीन वाचले, तेव्हा लक्ष वेधलं ते त्याने काय बोललं यावर नव्हे, तर काय न बोललं यावर. त्याची ताकद शांत आहे. तो निरीक्षण आणि योग्य वेळेवर अवलंबून असतो. मुलांच्या भोवती तो जणू एखादा मजेशीर, लाडावणारा ज्येष्ठ वाटतो, पण त्यामागे नेहमीच खोल हेतू असतो. या लेयर्सचा समतोल साधणं आव्हानात्मक आणि रोचक आहे, आणि हाच शकुनीला साकारताना सर्वात आकर्षक भाग आहे." हस्तिनापुर के वीर प्रेक्षकांना महाभारताचा एक ताजा आणि गुंतवून ठेवणारा दृष्टिकोन देणार आहे, जिथे मूल्यं, संगोपन आणि नाती या दंतकथांना आकार देतात. सोनी सबवर लवकरच येत आहे 'हस्तिनापुर के वीर' – पाहण्यासाठी ट्यून इन करा

## राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**पुणे (दै. संध्या) :**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम्' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम १६ मार्च २०२६ पासून सुरु आहे, नागरिकांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करुन राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारित होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था,संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खासगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू ही हस्तलिखिते स्वखुशीने शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन स्वीकारणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत, यामध्ये कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे स्वतंत्र केंद्राचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय तसेच अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून कामकाज करणार आहेत.

या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत "Gyan Bharatam" हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## शिरूरमध्ये एम.डी. ड्रग्ससह तिघांना अटक; २१.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**कवठे येमाई (दै. संध्या) :**

स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त कारवाईत अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. १७ एप्रिल २६ रोजी पहाटे सुमारे दीड वाजता शिरूरच्या बाबुरावनगर ते न्हावरे (कानिफनाथ) फाटा रोड परिसरात ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी विशाल मारुती मोरे (वय 20, रा. बाफनामळा, शिरूर), प्रतीक संतोष लंघे (वय 25, रा. करडे, ता. शिरूर) आणि मिथुन विजयपाल सिंग (वय 26, रा. रामलिंग रोड, शिरूर) या तिघांना अटक करण्यात आली आहे.शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून एकूण ४७.६० ग्रॅम मॅफेड्रोन (एम.डी.) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून त्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ९ लाख ५२ हजार रुपये आहे. याशिवाय दोन चारचाकी वाहने (वॅगनार व वेरना) आणि इतर साहित्य असा एकूण २१ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पाटील वॉशिंग सेंटरजवळ, शिवसाईलिला मंगल कार्यालयासमोर कच्च्या रस्त्याच्या कडेला करण्यात आली. आरोपी हे अंमली पदार्थ विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या बाळगत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार तुषार अशोककुमार पंदारे यांनी फिर्याद दिली असून शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर ३३५/२०२६ अन्वये एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१ (ब) तसेच भारतीय न्यास संहिता कलम ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलीस हवालदार आगलावे यांनी दाखल अंमलदार म्हणून काम पाहिले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत. प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

# शहराच्या जडणघडणीत 'बीएआय'सारख्या संस्थांचे योगदान

## नवलकिशोर राम यांचे मत; बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ

**पुणे (दै. संध्या) :**

■ **बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पुणे सेंटरच्या अध्यक्षपदी अजय गुजर यांची फेरनिवड**




"पुण्याची ओळख 'पेन्शनर्स पॅराडाईज' अशी असली, तरी संस्कृती, इतिहास आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदानामुळे या शहराने स्वतंत्र वैशिष्ट्य जपले आहे. नियोजनबद्ध विकास, रिअल इस्टेट क्षेत्रातील वाढ आणि उद्योगांच्या विस्तारामुळे आज पुणे आयटी, शिक्षण, वैद्यकीय आणि स्टार्टअप क्षेत्राचे प्रमुख केंद्र बनले आहे. शहराच्या या जडणघडणीत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) यांसारख्या संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे," असे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांनी केले. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या पदग्रहण समारंभात नवलकिशोर राम बोलत होते. हॉटेल ग्रँड शेरेटोन येथे आयोजित समारंभात अतिरिक्त कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ, बीएआय महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रकाश मेंडा, बीएआय पुणे सेंटरचे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे, सचिव डॉ. महेश राठी, खजिनदार सुशील अग्रवाल, मावळते उपाध्यक्ष महेश मायदेव, सचिव सी. एच. रतलानी, सुनील मते आदी उपस्थित होते. अध्यक्षपदी अजय गुजर यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

नवलकिशोर राम म्हणाले, "पुणे शहराने संतुलित विकासाचा आदर्श ठेवला आहे. आयटी, शिक्षण, वैद्यकीय सेवा, कला आणि परवडणारी घरे तसेच व्यावसायिक जागा यामुळे शहराचा वेगाने विस्तार होत आहे. देशातील सुमारे ५०० 'जीसीसी' पुण्यात कार्यरत असून, स्टार्टअपसाठीही हे शहर आकर्षणाचे केंद्र बनले आहे. शहरातील विकासाला गती मिळाली असली, तरी नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये काम करण्याची गरज आहे. झोपडपट्ट्यांचे वाढते प्रमाण, वाहतूक कोंडी, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील मर्यादा आणि नागरिकांशी संवादाचा अभाव या आव्हानांवर काम करावे लागेल. शाश्वत विकासासाठी सर्व घटकांनी एकत्र यावे. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, सक्षम इकोसिस्टम आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणे गरजेचे आहे. मेट्रो प्रकल्प सुरू झाला असला, तरी स्थानिक कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासह 'पीएमपीएमएल'चा प्रभावी वापर व्हावा." दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करत अजय गुजर म्हणाले, "असोसिएशनच्या कार्यालयाचे नूतनीकरण, बांधकाम क्षेत्रातील सर्व उत्पादक, साहित्य आणि तंत्रज्ञान याचे भव्य प्रदर्शन, राष्ट्रीय स्तरावरील 'बीएआय' सदस्यांचे अधिवेशन घेणार आहोत. बांधकाम क्षेत्रातील समस्यांवर चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल. साईट व्हिजिट्स, तांत्रिक चर्चासत्रे आणि नवीन मशिनरी व तंत्रज्ञानाविषयी ज्ञानवृद्धीवर भर दिला जाईल. शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून बांधकाम क्षेत्रातील प्रश्न सोडवण्यासह कामगारांच्या मुलांना प्रोत्साहन, 'वेल बिल्ट स्ट्रक्चर' स्पर्धा तसेच ग्रामीण भागात मुलींसाठी स्वच्छतागृह उभारणीसारखे उपक्रम हाती घेणार आहोत."

बाळासाहेब वाघ म्हणाले, "कामगारांच्या कल्याणासाठी कामगार आयुक्तालय आहे. कामगार व त्यांच्या मुलांसाठी शिक्षण, आरोग्य व विमा आदी योजना आहेत. बिल्डर आणि कामगार आयुक्तालय यांच्यातील समन्वय वाढला, तर कामगारांना त्याचा लाभ चांगल्या पद्धतीने होईल. एकमेकांना पूरक भूमिकेतून काम केले, तर कामगार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे अधिक सोयीचे होईल. बिल्डर्स असोसिएशनने यामध्ये पुढाकार घ्यावा." यावेळी नियामक मंडळातील रणजित मोरे, जगन्नाथ जाधव, डॉ. आर. बी. कृष्णानी यांचा, तसेच वर्षभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाश मेंडा यांनीही मनोगत व्यक्त केले. संजय आपटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महेश राठी यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### निकालाआधीच पिंपरी चिंचवडमध्ये झळकले सुनेत्रा पवारांच्या विजयाचे बॅनर

पिंपरी (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे बॅनर पिंपरी चिंचवड शहरात झळकू लागले आहेत. पिंपरी चिंचवडमधील अतिउत्साही कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी अभिनंदनाचे फ्लेक्स लावून जल्लोषाला सुरुवात केली आहे. बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा विजय निश्चित मानला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर समर्थकांकडून आधीच अभिनंदनाचे बॅनर लावले जात असून, निकालापूर्वीच विजय साजरा करण्याची घाई दिसून येत आहे. दरम्यान, अधिकृत निकाल लागण्यापूर्वीच असे बॅनर झळकल्यामुळे यांची चांगलीच चर्चा रंगली आहे. निवडणुकीचा निकाल काय लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले असताना कार्यकर्त्यांचा उत्साह मात्र ओसंडून वाहताना दिसत आहे.

### पुनावळे येथील ऑक्सीजन पार्कमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे वाढवण्याची मागणी



पिंपरी (दैनिक संध्या) : पुनावळे येथील ऑक्सीजन पार्क गार्डनमध्ये सुरक्षा वाढवण्यासाठी अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी करण्यात आली आहे. युवासेनेचे उपशहर प्रमुख सागर एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात विद्युत विभाग ड प्रभागाचे कार्यकारी अभियंता यांना लेखी निवेदन दिले आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की, स्मार्ट सिटी अंतर्गत गार्डनमध्ये आधीच काही सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असले तरी ते अपुरे ठरत आहेत. गार्डन परिसरात मोठ्या आणि लहान झाडांची संख्या जास्त असल्यामुळे अनेक ठिकाणी अंधाराचे प्रमाण वाढते. त्यामुळे रात्रीच्या वेळी अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गार्डनमध्ये अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



### रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर महापालिकेची कडक कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छतेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून कचरा टाकणाऱ्या नागरिकांविरोधात कठोर पावले उचलण्यात येत आहेत. ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव अंतर्गत प्रभाग क्र.२४ मध्ये सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात आली. ही कारवाई क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक स्नेहल सुकटे तसेच आरोग्य सहाय्यक प्रशांत गोठे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत प्रशांत पवार व सुधीर वायदंडे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत कारवाई अंमलात आणली. महापालिकेच्या पथकाने संबंधित नागरिकांना दंडात्मक कारवाई करत स्वच्छतेबाबत सूचना दिल्या. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये व महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. दरम्यान, अशा प्रकारच्या स्वच्छता मोहिमा व कारवाया पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा महापालिकेकडून देण्यात आला आहे.



### मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना निशा दिनेश यादव यांच्या हस्ते प्लेट वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : कुदळवाडी येथील मनपा शाळा क्रमांक 89 मध्ये विद्यार्थ्यांसाठी एक उपयुक्त व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. चिंचवड विधानसभेचे लोकप्रिय आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना जेवणासाठी प्लेट वाटप करण्यात आले. निशा यादव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक संपत पोटघन सर तसेच इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहण्यासारखा होता. विद्यार्थ्यांच्या समाधानातच या उपक्रमाचे खरे यश दडले असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. अशा सेवाभावी उपक्रमांमुळे समाजाशी नाळ अधिक दृढ होत असून, पुढील काळातही अशा सामाजिक कार्याची परंपरा अधिक बळकट व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### ई-चार्जिंग सवलतीवर प्रश्न; सोसायट्यांना लाभ कधी?

पिंपरी (दैनिक संध्या) : शहर प्रदूषणमुक्त व्हावे, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून नागरिकांनी ई वाहनांचा वापर करावा, यासाठी आवाहन केले जात आहे; तसेच या गाड्यांसाठी लागणारे चार्जिंग स्टेशन वैयक्तिक अथवा गृहनिर्माण सोसायट्यांनी उभारावेत म्हणून मिळकत करात सवलत लागू केली. यानुसार, शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांनी ई चार्जिंग पॉइंट उभारले; परंतु काही गृहनिर्माण सोसायट्यांना महापालिकेकडून करसवलत मिळाली नसल्याचे या सोसायटीधारकांचे म्हणणे आहे. शहरात पेट्रोल, डिझेलवरील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे शहर प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे मत अनेक पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले. त्यामुळे संपूर्ण राज्यात ई वाहनांचा वापर वाढावा म्हणून राज्य सरकार आणि महापालिकेने मिळकत करात दोन ते पाच टक्क्यांची सवलत लागू केली आहे.

# कोयत्याने दहशत करत खंडणी मागणाऱ्या दोघांना अटक

**पोलिसांनी काढली आरोपींची 'धिंड'**



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपळे सौदागर परिसरात कोयत्याच्या धाकावर एका दुकानदाराकडे ४ लाख रुपयांची खंडणी मागून दहशत माजवणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना सांगवी पोलिसांनी अटक केली आहे. ओंकार उद्धव बाबर आणि सोपान गजानन बुलाखे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी पिंपळे सौदागर येथील एका दुकानात घुसून दुकानदाराकडे ४ लाख रुपयांची मागणी केली. मात्र, दुकानदाराने खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर संतप्त झालेल्या आरोपींनी हातात कोयता घेऊन दुकानातील साहित्याची तोडफोड केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सांगवी पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि दोन्ही आरोपींना अटक केली. तसेच गुन्ह्यात वापरलेला कोयता जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली दहशत दूर करण्यासाठी पोलिसांनी आरोपींची भररस्त्यात धिंड काढत कडक संदेश दिला. पोलिसांच्या या कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून सांगवी पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्मार्ट सिटी अशी ओळख असलेल्या पिंपळे सौदागर परिसरात या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. नगरसेवक शत्रुघ्न काटे आणि नगरसेविका अनिता संदीप काटे यांनी सांगवी पोलिसांची भेट घेऊन या संदर्भात तातडीने कारवाई करत या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली होती.

## मावळमध्ये प्लास्टिकमुक्त अभियानाला मंजुरी

**वडगाव मावळ (दै. संध्या)**

■ कचरा वर्गीकरण, सिंगल-यूज प्लास्टिक बंदीवर भर; पंचायत समितीचा निर्णय

मावळ पंचायत समितीच्या बैठकीत प्लास्टिक व कचरामुक्त मावळ संकल्पना राबविण्याच्या प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. मावळ पंचायत समितीच्या माध्यमातून तालुकाभर हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. गटनेते दिलीप ढोरे यांनी या संदर्भातील प्रस्ताव मांडला होता. सभापती सुनीता येवले यांच्या अध्यक्षतेखाली व उपसभापती साहेबराव कारके, गटविकास अधिकारी कुलदीप प्रधान यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस गटनेते दिलीप ढोरे, सदस्य राजेंद्र कडलग, योगेश लोहर, समीर जाधव, प्राची गायकवाड, रेश्मा देवकर, शैला कालेकर, आशा मोरमारे व सर्व अधिकारी उपस्थित होते. या वेळी तालुक्यात वाढत चाललेल्या प्लास्टिक व कचरा समस्येकडे गटनेते ढोरे यांनी लक्ष वेधले. मावळमधील वाढत्या प्लास्टिक वापरावर चिंता व्यक्त करून सिंगल-यूज प्लास्टिकचा वाढता वापर, कचरा वर्गीकरणाचा अभाव, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याची सवय आणि नागरिकांमधील जागरूकतेचा अभाव यामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे मत व्यक्त केले.

## सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवडचे वाढते शहरीकरण आणि भविष्यातील सांडपाणी व्यवस्थापनाची गरज ओळखून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला (STP) भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. चिखली परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली. सांडपाण्याचे शुद्धीकरण कोणत्या स्तरावर केले जाते आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर कसा करता येईल, यावर त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. शहरातील जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक उपाययोजनांचा आढावा घेताना त्यांनी व्यवस्थापकांना सूचनाही केल्या. पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच उपलब्ध पाण्याचा पुनर्वापर करून नैसर्गिक स्त्रोतांवरील ताण कमी करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले. शहराचा होणारा विस्तार पाहता आगामी काळात सांडपाणी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> भविष्यातील गरजा लक्षात घेऊन चिखली येथील प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यावर आणि पूर्ण क्षमतेने हा प्रकल्प राबविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.
>
> **– अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'अभिव्यक्ती' कला महोत्सवाची सुरेल पर्वणी

**नामवंत कलाकारांच्या उपस्थितीत रंगणार सांस्कृतिक जल्लोष; महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहकार्य**

**पिंपरी (दै. संध्या)**




पिंपरी-चिंचवड शहरात कला, संस्कृती आणि सुरांची एक अविस्मरणीय पर्वणी रंगणार आहे. संस्कार भारती पश्चिम प्रांत पिंपरी चिंचवड समितीच्या वतीने "अभिव्यक्ती – सृजनाच्या आनंदाची कला महोत्सव २०२६" हा भव्य सांस्कृतिक महोत्सव शनिवार व रविवार, दि.२५ व २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे ठिकाण ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे असून, रसिकांसाठी हा कार्यक्रम एक सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे.

शनिवारी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत उद्घाटन समारंभ पार पडणार असून, मंदिर स्थापत्य विषयावर ओजस हिरानी यांचे व्याख्यान होणार आहे. यानंतर नृत्यपंढरी या सत्रात श्रद्धा हर्डीकर शिंदे यांचे कथक नृत्य सादर होईल. डॉ. पं. नंदकिशोर कपोते कथ्थक नृत्य तसेच पं. कैवल्यकुमार गुरव यांचे शास्त्रीय गायन रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहे. दिवसाची सांगता 'संपूर्ण वंदे मातरम्' या देशभक्तीपर सादरीकरणाने होईल. संध्याकाळी रात्री ८ ते २ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेत डॉ. भावार्थ देखणे यांचे बहुरूपी भारूड सादर होणार आहे. त्यानंतर रंगमुद्रा थिएटर फाउंडेशन प्रस्तुत 'आठवणींचा गाव' या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या लोककलेचे दर्शन घडेल. 'स्वरांजली – आशा भोसले विशेष' या कार्यक्रमात सुरेल गाण्यांची मैफल रंगेल. रविवारच्या पुढील सत्रात पं. सुधाकर चव्हाण यांचे शास्त्रीय गायन, डॉ. संध्या पुरेचा यांचे भरतनाट्यम नृत्य आणि पद्मश्री पं. रोणू मजुमदार यांचे बासरी वादन हे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहेत. रात्री 'त्या तिघी' या सादरीकरणातून स्वातंत्र्यकुंडातील सावरकर घराण्यातील तीन वीरांगनांची गाथा उलगडली जाणार असून, शेवटी 'संपूर्ण वंदे मातरम्'ने महोत्सवाची सांगता होईल. या महोत्सवाचे आयोजन आणि नियोजन लीना आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. तसेच महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सहकार्य लाभले आहे.

"परंपरा, प्रतिभा आणि सुरांचा सुरेल संगम" अशी ओळख असलेला हा महोत्सव पिंपरी-चिंचवडकरांसाठी कला, संस्कृती आणि सृजनाचा एक अनोखा उत्सव ठरणार आहे. विविध कलाप्रकार, दिग्गज कलाकार आणि सांस्कृतिक वारशाचा संगम अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

> पिंपरी-चिंचवड ही केवळ औद्योगिक नगरी नसून ती समृद्ध कला, संस्कृती आणि परंपरेचीही भूमी आहे. 'अभिव्यक्ती'सारखे महोत्सव आपल्या नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देतात आणि कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवणारा हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक वैभवात निश्चितच भर घालणारा ठरेल.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



## लोणावळा लोकलमध्ये केळवण; मित्रांचा अनोखा उत्सव

**लोणावळा (दै. संध्या)**

■ धावत्या ट्रेनमध्ये साजरा सोहळा; प्रवाशांचेही कौतूक, सोशल मीडियावर चर्चा

लग्न म्हटलं की लगबग, उत्साह आणि पारंपरिक सोहळ्यांची रेलचेल आलीच. सहसा हॉटेल किंवा घरगुती वातावरणात होणारे केळवण शुक्रवारी लोणावळ्यातील काही तरुणांनी चक्क धावत्या लोकलमध्ये साजरे केले. लोणावळा-पुणे लोकलमध्ये पार पडलेल्या या आगळ्यावेगळ्या केळवणाची सध्या सर्वत्र चर्चा होत असून, प्रवाशांसाठी हा एक सुखद धक्का ठरला. लोणावळा रेल्वे स्थानकावरून सकाळी 7.25 वाजता सुटणाऱ्या लोकलमध्ये हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. गोरख नाणेकर याच्या विवाहाच्यानिमित्ताने त्याच्या मित्रमंडळींनी हे खास सरप्राईज प्लॅन केले होते. लग्नापूर्वीचे केळवण अधिक संस्मरणीय व्हावे, या उद्देशाने डब्यातच पारंपरिक पद्धतीने हा सोहळा साजरा करण्यात आला. मित्रमंडळींनी एकत्र जमत डब्यातच केळवणाचा मान राखला.

या वेळी साधेपणा आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. गप्पा-टप्पा, थट्टा-मस्करी आणि घरून आणलेल्या जेवणाचा आस्वाद घेत सर्वांनी गोरखला लग्नाच्या शुभेच्छा दिल्या. जिथे मित्र, तिथेच सण ही भावना या वेळी खऱ्या अर्थाने दिसून आली.

# पिंपरी-चिंचवडचा अर्थसंकल्प रखडला; व्यवहारांवर प्रश्न

**२५५ कोटींच्या उपसूचना मंजूर; मंजुरीपूर्वीच व्यवहारांवर धावपळ**



**पिंपरी (दै. संध्या)**

आर्थिक वर्षातील पहिला महिना एप्रिल संपत आला तरी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन 2026-27 चा अर्थसंकल्प मंजूर झालेला नाही. पुढील मे महिन्यात तो मंजूर होणार आहे. त्यामुळे आतापर्यंत झालेले व्यवहार अधिकृत करण्यासाठी संबंधितांची धावाधाव सुरू आहे. ज्या विभागांची बिले मंजूर झाली. ठेकेदारांना बिले अदा करण्यात आली, त्या विभागांसह लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहेत. अर्थसंकल्प अजून मंजूर झाला नसल्याने विभागप्रमुखांना निविदा काढण्यात तांत्रिक अडचण येत आहेत. आवश्यक कामांसाठी पुरेशा निधीची तरतूद नसल्याने विभागप्रमुखांसह पदाधिकारी व नगरसेवकांची गोची झाली आहे. अर्थसंकल्प मंजुरीपूर्वीच करण्यात आलेले आर्थिक व्यवहार अधिकृत करण्यासाठी अनेकांची धावपळ सुरू झाली आहे. त्यासाठी बैठका आणि चर्चांचे सत्र सुरू झाले आहे. कोणत्याही परिस्थिती आपल्या कामांसाठी तरतूद मिळविण्यासाठी पदाधिकाऱ्यांसह नगरसेवकांची धडपड सुरू झाली आहे.

स्थायी समिती सभा आणि सर्वसाधारण सभेकडून अर्थसंकल्पास तब्बल 1 हजार 100 कोटी रुपयांच्या एकूण 157 उपसूचना देण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ 255 कोटी रुपयांच्या उपसूचना स्वीकारण्यात (ग्राह्य) आल्या आहेत. तर, उर्वरित उपसूचना फेटाळण्यात (अग्राह्य) आल्या आहेत. त्यामुळे अर्थसंकल्प फुगून 5 हजार 914 कोटी रुपयांवर पोहचला आहे. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सन 2026-27 चा अर्थसंकल्प 28 फेबुवारीला स्थायी समितीला सादर केला होता. त्यानंतर स्थायी समितीने अर्थसंकल्पास एकूण 3 उपसूचना दिल्या होत्या. एका उपसूचनेत शेकडो उपसूचनांचा समावेश आहे. त्यापैकी 1 उपसूचना पूर्णपणे मान्य करण्यात आली आहे. तर, 2 उपसूचना अशंतः मान्य करण्यात आल्या आहेत. त्या उपसूचना एकूण 140 कोटी आणि 73 कोटी असे एकूण 213 कोटी रुपयांच्या आहेत. तर, सर्वसाधारण सभेने एकूण 77 वेगवेगळ्या उपसूचना दिल्या होत्या. त्यापैकी केवळ 12 उपसूचना ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. त्या उपसूचनांची तरतूद 42 कोटी रुपये इतकी आहे. तर, उर्वरित 65 उपसूचना अग्राह्य करण्यात आल्या आहेत.

अशा एकूण 15 उपसूचना ग्राह्य धरण्यात आल्या असून, त्या तब्बल 255 कोटी रुपयांच्या आहेत. त्यामुळे अर्थसंकल्प 5 हजार 660 कोटी रुपयांवरून 5 हजार 914 कोटी रुपयांवर जाऊन पोहचला आहे. बांधकाम परवानगी, कर संकलन आणि आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वाढलेल्या उत्पन्नातून उपसूचनेतील कामांच्या 255 कोटी रुपयांचा खर्चाचा ताळमेळ लावला जाणार आहे, असे लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दावा केला आहे. स्थायी समिती तसेच, सर्वसाधारण सभेने 24 मार्चला दिलेल्या उपसूचनांवर आज तात्काळ अतिवेगात कार्यवाही सुरू करण्यात आली. तब्बल महिन्याभरानंतर त्या विभागास जाग आली. विभागाने स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या उपसूचना ग्राह्य व अग्राह्य करण्याचे कामकाज आज एका दिवसात पूर्ण केले. त्यामुळे कोणत्या उपसूचना मंजूर झाल्या आणि कोणत्या फेटाळण्यात आल्या, हे स्पष्ट झाले आहे.

### पुस्तिकाही छापणार

लेखा विभागाकडून अर्थसंकल्पासाठी काही उपसूचना स्वीकारण्यात आल्या आहेत. त्या उपसूचनांच्या कामांचा समावेश करून सुधारित सन 2026-27 च्या अर्थसंकल्पाची पुस्तिका तयार केली जाणार आहे. पुस्तिका आठवड्याभरात छापण्यात येईल, असे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रमोद भोसले यांनी सांगितले. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक व नागरिकांना अर्थसंकल्पातील कामांची तसेच, त्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीची माहिती समजणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## अजित पवारांचा विमान अपघात का अघोरी विद्या कनेक्शन

■ बारामतीतील विमान अपघाताचा तपास जलद गतीने व्हावा - अमोल मिटकरी

बारामती (दैनिक संध्या) : राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी बारामतीतील अजित पवारांच्या विमान अपघाताचे कनेक्शन अघोरी विद्या तर नाही ना असे म्हणत प्रश्न निर्माण केला आहे.नोव्हेंबर महिन्यात देखील अजित पवारांच्या घराजवळ आणि कार्यालयाजवळ अशीच अघोरी पूजा झाली होती,अशी माहिती ही मिटकरी यांनी दिली होती.त्यानंतर आता पुन्हा एकदा अमोल मिटकरींनी विद्या प्रतिष्ठान एआय इमारत बांधकामाजवळ मांडलेली अघोरी पूजा मांडल्याची माहिती देत फोटो देखील शेअर केले आहेत.त्याचबरोबर दादा सकाळी इथेच इमारत बांधकाम पाहणी करण्यासाठी येणार होते त्याआधी मध्यरात्री अशी अघोरी पूजा मांडल्याचे बोलले जात आहे.28 डिसेंबर 2026 रोजी विद्या प्रतिष्ठान एआय इमारत बांधकामा जवळ मध्यरात्री मांडलेली ही अघोरी पूजा मांडली असे सांगितले.दादा सकाळी इथेच इमारत बांधकाम पाहण्यासाठी येणार होते,असे मिटकरींनी त्यांच्या सोशल मीडिया वरती दोन पोस्ट शेअर करत त्याबाबतची माहिती आणि फोटो शेअर केला आहे.अमोल मिटकरी यांनी पहिल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की,बारामतीतील सहयोग येथील घर, काटेवाडीतील घर,विद्या प्रतिष्ठान येथील एआय इमारत येथे अघोरी पूजा होतात,हे बाहेरून येऊन करणाऱ्यांना शक्य नाही,तर अघोरी विद्या मानणारे त्यांच्याशी जोडले जाणारे राजकीय बलाढ्य व्यक्ती व त्यांचे बारामतीला असलेले हस्तक याशिवाय हे होऊ शकत,अशातच या कालावधीत बारामतीत काही व्हिडिओ प्रसार माध्यमांत फिरत आहेत.डिसेंबर 2025 रोजी विद्या प्रतिष्ठान एआय इमारत बांधकामाजवळ ही अघोरी पूजा मध्यरात्री मांडली होती, आदरणीय दादा सकाळी इमारत बांधकाम पाहणी करण्यासाठी येणार होते,अशी माहिती मिटकरींनी पोस्ट केली आहे. बोकड उलटे टांगून खाली अघोरी पूजा तर आणखी एका पोस्टमध्ये अमोल मिटकरींनी म्हटले आहे की,खताळपट्टा काटेवाडी परिसरात दादांच्या बंगल्यासमोर हे भयंकर दृश्य दिसले होते,त्यामुळे बारामतीतील विमान अपघाताचा तपास जलद गतीने व्हावा असे अमोल मिटकरींनी म्हटले आहे.

## स्मृती जागवणाऱ्या उपक्रमांच्या आयोजनासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश

पुणे (दैनिक संध्या) : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जन्मद्वीशताब्दी, चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि महात्मा फुले यांच्या नगरसेवक पदाची दीडशे वर्ष या निमित्ताने महापालिकेच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे व उपक्रमांचे आयोजन करण्यास स्थायी समितीने मान्यता सर्वसाधारण सभेत दिली असून या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी विशेष समिती स्थापन करण्याचे आदेश उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सभापती पदावर असताना दिले आहेत. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जन्मद्वीशताब्दी, चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि महात्मा फुले यांच्या नगरसेवक पदाची दीडशे वर्ष यामुळे हे वर्ष सामाजिक सुधारणा वर्ष म्हणून साजरे करावे. महात्मा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी स्मृतींना उजाळा मिळावा यासाठी महापालिकेच्या वतीने सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जावे, अशी सूचना परशुराम वाडेकर यांनी केली होती. या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. या प्रस्तावावर चर्चा करत असताना सभेच्या अध्यक्षपदी वाडेकर होते. त्याचप्रमाणे, नाना पेठ येथील 'दि डीप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेला दिलेल्या महापालिकेच्या जागेचा करार संपुष्टात आला असून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या या संस्थेबरोबरच्या कराराचे नूतनीकरण करावे, या प्रस्तावालाही स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

## मुलीवर अत्याचार करणाऱ्या दोन आरोपींना आळेफाटा पोलीसांनी ठोकल्या बेड्या



नारायणगाव (दैनिक संध्या): आईचा आजार बरा करण्याचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीवर महिनाभर अत्याचार करणाऱ्या पंकज देवराम घोलप आणि नाना बर्डे (रा. येडगाव) या दोन भोंदू बाबांना आळेफाटा पोलिसांनी बेड्या ठोकून अटक करण्यात आली आहे. आरोपींनी अंगात 'दैवी शक्ती' असल्याचे भासवून पीडितेच्या आईला अंगारा देऊन उपचार करण्याचा बनाव रचला. याच काळात पंकज घोलप याने पीडितेशी लग्नाचे आमिष दाखवून जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर आरोपीने लग्नास नकार देत तिला जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेने व तिच्या नातेवाईकांनी आळेफाटा पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करून घोलप व बर्डे या आरोपींवर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), पोक्सो (POCSO) आणि जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा (गु.र.नं. ११०/२०२६) दाखल केला आहे. शुक्रवारी आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर हे करत आहेत.

## आळे येथे नारळाच्या झाडावर वीज कोसळून झाड पूर्णपणे खाक



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील आळे येथील आगरमळा परिसरात विजांच्या कडकडांसह झालेल्या अवकाळी पावसामुळे एका नारळाच्या झाडावर वीज कोसळून नारळाचे झाड हे पूर्णपणे खाक झाले आहे. सुदैवाने नारळाचे झाड हे घरापासून काही अंतरावर असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आळे परिसरात गुरुवार दि. 23 रोजी रात्री विजांच्या कडकडांसह झालेल्या पावसामुळे आगरमळा येथील एका शेतातील नारळाच्या झाडावर अचानक वीज पडली. वीज पडताच नारळाच्या झाडाने पेट घेतला. त्यात ते नारळाचे झाड पूर्णपणे खाक झाले. खबरदारी म्हणून अनेक जणांनी घरातील विद्युत उपकरणे बंद केली.या नारळाच्या झाडाखाली कोणीही नसल्यामुळे जीवित हानी झाली नाही. हवामान विभागाकडून सांगण्यात आले की, विजांच्या कडकडासह अवकाळी पाऊस चालू असताना झाडांच्या खाली उभे राहू नये . सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा.

# कोळशासाठी डोंगर व घनदाट जंगलांना इंधन टाकून लावली जातेय आग

चाकण (दै. संध्या)

सह्याद्रीच्या पर्वतरांगा असलेल्या भीमाशंकर अभयारण्यालगतच्या सर्व डोंगरांना व घनदाट जंगलाना कोळशासाठी पेट्रोल, डिझेल टाकून आग लावली जात आहे. प्रामुख्याने याकडे स्थानिक नागरिक व वन विभागाकडून जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले जात असून, यामुळे भीमाशंकर परिसरातील दुर्मीळ वृक्ष व अंत्यत मौल्यवान वनऔषधे धोक्यात आली आहेत. खेड तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्यालगत असलेल्या खरपूड, आंबोली, वांद्रे व तोरणे परिसरातील लहान मोठ्या टेकड्या व खाजगी वनांना सर्रास दरवर्षी वणवे लावले जातात. गेल्या दोन तीन वर्षांपासून फार मोठ्या प्रमाणात या परिसरातील बहुतेक सर्व डोंगर व घनदाट भागातील मोठी झाडे असलेल्या वन विभागांच्या जंगलामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात वणवे लागताना दिसत आहेत. यामध्ये वन प्राण्यांचा तर जीव जातच आहे. परंतु फार मौल्यवान वनसंपदा देखील नष्ट होत आहे. खाजगी वनांमध्ये गवत व जंगलातील जाळ्या व कचरा साफ होण्यासाठी वणवे लावले जातात.



परंतु सध्या भीमाशंकर अभयारण्यालगतच्या घनदाट जंगलात लागणारे वणवे मोठ मोठ्या झाडांचा कोळसा मिळविण्यासाठी लावले जात असल्याची चर्चा लगतच्या गावांमध्ये आहे. यासाठी चक्क पेट्रोल, डिझेलचा वापर करत असल्याचे काही आदिवासी बांधवांनी सांगितले. परंतु याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येते. यात वन विभागाचे कर्मचारी, वन हक्क समिती व जंगल माफियांचा संगनमत असल्याचे आदिवासी बांधवांचे म्हणणे आहे.

“निव्वळ कोळशासाठी घनदाट जंगल व डोंगरांना पेट्रोल व डिझेल टाकून आग लावणे घातक आहे. दुर्मिळ वृक्ष व मौल्यवान वनऔषधी वनस्पती धोक्यात येणार नाही, यासाठी ठोस उपयोजना करण्याची गरज आहे.”
**- विनोद महाळुंगकर पाटील, प्रदेश संपर्कप्रमुख, अखिल भारतीय वारकरी महामंडळ**

उन्हाळ्यात अनेक वेळा एखाद्या जंगली प्राण्याची शिकार करण्यासाठी, शिकार सहज दिसावी म्हणून सावज हेरण्यासाठी अडसर ठरणारे पावसाळ्यात अस्ताव्यस्त वाढलेले तण पेटवतात व वणव्याचा प्रसार करतात.

त्यात लाकूड तस्कर रात्रंदिवस जंगलात झाडे कत्तलीसाठी जातात. अन्न शिजवावे म्हणून पेटवलेली चूल आणि कत्तलीसाठी निवडलेल्या झाडाजवळ पोहचता यावे म्हणून अडसर ठरणाऱ्या तण, वेली आणि काटेरी झाडांच्या विळख्याच्या जाळ्या नष्ट व्हाव्या म्हणून आगी लावल्या जातात. असे या भागातील स्थानिक नागरिक सांगतात. याचा फार मोठा परिणाम वन संपत्तीवर होत असून, अनेक मौल्यवान वन औषधी वनस्पती व वृक्ष नामशेष होत आहे. जंगलात आता आगी लावणाऱ्यांवर वन विभागाने पाळत ठेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### वनअधिकारी फिरकतच नाहीत

“भीमाशंकर लगतच्या वांद्रे, तोरणे, खरपुड, विराम, या सर्व परिसरातील वन विभागाचे रक्षण करण्यासाठी व वनांच्या जबाबदारीसाठी स्वतंत्र वनपाल, वनरक्षक नियुक्त केले जातात. परंतु सध्या या पदावर महिलांची नियुक्ती केली असून, अनेक महिला अधिकारी नियुक्ती झाल्यापासून आपल्या वनक्षेत्रात फिरकल्याच नाहीत. यातील बहुतेक महिला अधिकारी व कर्मचारी मुख्य कार्यालय चाकण येथेच बसत असून, आपल्या कामाच्या ठिकाणी फिरकत देखील नाहीत.”

### जंगल माफीयांना मोकळे रान

“वनक्षेत्रात वनअधिकारी फिरकत नसल्याने जंगल माफियांना मोकळे रान मिळत आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून वन विभागाच्या घनदाट जंगलात पेट्रोल, डिझेल टाकून जंगल पेटवले जात असताना वन विभागाकडून एकही कारवाई किंवा साधा पंचनामा देखील केला जात नाही, हे धक्कादायक आहे.”

## पिसर्वे ते राजुरी मधील पुलावरील खड्डयांच्या गॅपमुळे प्रवासी हैराण

### तातडीने दुरुस्तीची मागणी

पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील पिसर्वे,नायगाव ते राजुरी रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण काम झाले आहे. या मुख्य रस्त्यावर असलेल्या पुलाच्या ठिकाणी मोठा खड्डयांचा गॅप झाल्यामुळे वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला असून लहान-मोठे अपघात घडत आहेत. पुलावरून जाताना वाहनांना अचानक धक्का बसत असल्याने संतुलन बिघडून अपघात घडले आहेत. या ठिकाणी योग्य चिन्हे किंवा इशारे नसल्यामुळे अपघातांचा धोका अधिक वाढत आहे. अनेक वाहनचालकांना या ठिकाणी दुखापतीही झाली आहे. डब्लू ओ एम कंपनीचे मुख्य मानव संसाधन अधिकारी(एच आर) शिवाजी चौंडकर व नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी

संबंधित विभागाकडे खड्डयांचा गॅप बुजवण्याची मागणी केली आहे.

पुलावरील खड्डयांचा गॅप तातडीने बुजवून रस्ता सुरळीत करावा, प्रवाशांच्या हाल थांबवावेत अपघात टाळावे व त्वरित काम करण्यात यावे.



अपघात टाळण्यासाठी सूचना फलक व सुरक्षा उपाययोजना कराव्यात.रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा.

## जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान


नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील आळेफाटा,राजुरी, वडगाव आनंद परिसरात झालेल्या विजांच्या कडकडासह अवकाळी पावसामुळे आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आहे.त्यामुळे लवकरात लवकर कृषी आणि महसूल विभागाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तालुक्यातील काही भागात कांदा काढणीचा हंगाम हा शेवटच्या टप्प्यात असतानाच अचानक झालेल्या या पावसामुळे शेतात काढून ठेवलेला कांदा भिजल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. तसेच नगदीपिकांसोबतच वाळलेला चाराही भिजल्याने पशुपालकांसमोर चारा टंचाईचे संकट उभे राहिले आहे.वडगाव आनंद परिसरातील शेतकऱ्यांचे उभे असलेले मका हे पीक आडवे पडून उध्वस्त झाले आहे. अशाच प्रकारचे नुकसान परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सहन करावे लागत आहे. कृषी आणि महसूल विभागाचा संप असला तरीही आपत्तीच्या काळात पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करणे ही तलाठ्यांची जबाबदारी असून संप असला तरीही ही कामे करावीच लागतील.

## ‘मी नेहमीच आत्मसंरक्षण शिकण्याकडे आकर्षित झाले

पुणे (दै. संध्या)

सोनी सबचा पुष्पा इम्पॉसिबल आपल्या भावनिक कथाकथनाने आणि हाय-इंटेन्सिटी ड्रामाने प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवत आहे. आगामी ट्रॅकमध्ये प्रेक्षकांना एक थरारक प्रसंग पाहायला मिळणार आहे, जिथे शनाया (मुस्कान बामने) चिराग (नितीन बाबू) ला गुंडांच्या तावडीतून वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालते आणि गंभीर जखमी होते. हा सिक्वेन्स केवळ कथानकातील टप्पे उंचावतो असं नाही, तर जीवघेण्या परिस्थितीत शनायाने दाखवलेलं धाडस आणि तिची उपस्थितीही अधोरेखित करतो. हा सीन साकारताना मुस्कानसाठी खूप कठीण होता आणि शनायाच्या भूमिकेला न्याय देण्यासाठी तिला भावनिक आणि शारीरिक दोन्ही पातळ्यांवर स्वतःला झोकून द्यावं लागलं. आपला अनुभव शेअर करताना मुस्कान बामने म्हणाली, “मला



नेहमीच सेल्फ-डिफेन्स शिकण्याची आवड आहे कारण मला वाटतं ही एक महत्त्वाची लाइफ स्किल आहे. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि तुम्हाला एक मजबूत स्त्री असल्याची जाणीव होते. या ट्रॅकचं शूटिंग करताना मला जाणवलं की असा विचारसरणी किती उपयुक्त ठरतो. सेटवर प्रशिक्षित प्रोफेशनल्स आणि कोरिओग्राफी असली तरी बेसिक मूव्हमेंट्स आणि रिॲक्शन्स समजून घेणं मला अधिक तयार आणि सीनशी जोडलेलं वाटलं. त्या क्षणी शनायापेक्षा मुस्कानच जास्त पुढे आली असं मला जाणवलं.”

## प्रेक्षकांनी दिलेल्या भरभरून प्रेमासाठी कलाकारांनी मानले आभार!

पुणे (दै. संध्या)

रश्मी शर्मा टेलिफिल्म्स निर्मित झी टीव्हीवरील कौटुंबिक मालिका ‘लक्ष्मी निवास’ने यशस्वीपणे 100 भाग पूर्ण करत एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. 12 जानेवारी 2026 रोजी प्रसारित व्हायला सुरुवात झालेल्या या मालिकेने भावनिक कथा व मध्यमवर्गीय भारतीय कुटुंबाचे वास्तवदर्शी चित्रण करत प्रेक्षकांशी घट्ट नाते जोडले आहे. स्वप्ने, जबाबदाऱ्या आणि नातेसंबंध यांचा प्रवास या मालिकेत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. लक्ष्मी आणि श्रीनिवास यांच्याभोवती फिरणारी ही कथा अशा दांपत्याची आहे, ज्यांनी अनेक दशके स्वतःच्या इच्छांपेक्षा कुटुंबाला प्राधान्य दिले. निवृत्तीनंतर अखेर स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ते प्रयत्न सुरू करतात. त्यांचा हा प्रवास भारतातील असंख्य कुटुंबांच्या रोजच्या संघर्षांना, त्यागाला आणि भावनिक गुंतागुंतीचे प्रतीक आहे, त्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आणि



त्यांना आपलीशी वाटणारी ठरते.

ह्या मालिकेत मुख्य भूमिकेत मानसी जोशी रॉय आणि राजेंद्र चावला यांच्यासह अन्य अनेक गुणी कलाकार असून या मालिकेने साधी, वास्तवदर्शी कथा आणि प्रभावी अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श केला आहे. 100 भाग पूर्ण झाल्यानिमित्त कलाकारांनी प्रेक्षकांचे मनापासून आभार मानत आतापर्यंतच्या प्रवासाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. श्रीनिवासची भूमिका साकारणारे राजेंद्र चावला म्हणाले, “‘लक्ष्मी निवास’चे 100 भाग पूर्ण करणे आमच्यासाठी खरोखरच खास आहे. आमच्या कथेला प्रेक्षकांनी दिलेले प्रेम आणि जिव्हाळा आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. श्रीनिवास ही भूमिका साकारणे हा माझ्यासाठी एक भावनिक प्रवास ठरला आहे. खऱ्या आयुष्यातील संघर्ष आणि स्वप्ने दाखवणाऱ्या या मालिकेचा भाग असल्याचा मला अभिमान आहे. पुढील प्रवासातही आम्ही प्रेक्षकांच्या मनाला असाच स्पर्श करत राहू अशी आशा करतो.”

लक्ष्मीची भूमिका साकारणाऱ्या मानसी जोशी रॉय म्हणाल्या, “लक्ष्मीची ताकद ती मोठ्या शब्दांत सांगत नसते, तर तिची ताकद तिच्या शांततेतून, रोजच्या आयुष्यातील निर्णयांमधून आणि ती ज्या सन्मानाने आपले संपूर्ण जग सांभाळते त्यातून दिसून येते. अनेक अर्थांनी ती एक सर्वोत्तम भारतीय स्त्री आहे. लक्ष्मीची ही भूमिका साकारण्याचा आनंद तिच्या व्यक्तिमत्त्वातील वेगवेगळ्या पैलूंचा शोध घेताना मिळतो. विशेषतः तिचे स्वगत मला खूप समाधान देणारे वाटते कारण त्यातून तिच्या मनाचा आरसा उघडतो, जिथे तिच्या प्रत्येक शब्दामागे तिचा अनुभव, सत्य आणि भावनांची खोली असते. ह्या शीर्षक भूमिकेत काम करणे माझ्यासाठी एक कलाकार म्हणून अत्यंत समाधानकारक आहे.”

आतापर्यंतच्या प्रवासात या मालिकेने हळूहळू आपला असा निष्ठावान प्रेक्षकवर्ग निर्माण केला असून मूल्ये, जिद्द आणि कुटुंबातील नातेसंबंधांचे महत्त्व अधोरेखित करणारी ही साधी पण प्रभावी कथा प्रेक्षकांच्या मनाला विशेष भावली आहे.

पहा ‘लक्ष्मी निवास’ मालिका दररोज संध्याकाळी 7:30 वाजता फक्त झी टीव्हीवर

# उरणच्या चाणजेत खरातच्या पत्नीच्या नावे २० गुंठे जमीन

### प्रकरण उघडकीस आल्यानंतर व्यवहार रद्द केल्याची तहसीलदारांची माहिती

उरण (दै. संध्या)

भोंदूगिरी करून शेकडो महिलांचा लैंगिक छळ करणारी अशोक खरात याची पत्नी कल्पना खरात हिच्या नावे उरणच्या चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील वीस गुंठे जमीन असल्याचे उघड झाले आहे. या वीस गुंठे जमिनीचा बाजार भाव हा ३ कोटींच्या वर असून ती अवघ्या ५८ लाख ५० हजार रुपयात खरेदी केली असल्याचा दस्त करण्यात आला आहे. कल्पना खरात ही फरारी असतांना हा व्यवहार झाल्याने या व्यवहार बाबत शंका व्यक्त केली जात असून याची चौकशी करण्याची मागणी



होऊ लागली आहे. खरेदी खत करून दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात जमीन खरेदी विक्रीत अडीच ते तीन कोटींचा व्यवहार झाला असावा असा संशय व्यक्त केला जात आहे. नाशिकच्या या भोंदू बाबाचे उरण कनेक्शन समोर आल्याने परिसरात मात्र उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. नाशिकच्या भोंदू बाबा अशोक खरात याचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. या प्रकरणी अटकेत असलेल्या खरातची एसआयटीकडून चौकशीही सुरू आहे.या दरम्यान खरातची पत्नीही फरार झाली आहे.

अटकेत असलेल्या आणि एसआयटीच्या चौकशीच्या फेऱ्यात अडकलेल्या अशोक खरात यांनी गैरमार्गाने कमावलेल्या पैशातून अनेक ठिकाणी जागा, जमिनी खरेदी केलेल्या आहेत. खरातनेही पत्नीच्या नावाने उरणमध्येही जमीन खरेदी केली आहे. पत्नी कल्पना अशोक कुमार खरात यांच्या नावावर खरातने उरण चाणजे महसूल हद्दीतील सर्व्हे नं. ३७१/३८ मध्ये २० गुंठे जमीन ५८ लाख ५० हजार रुपयांमध्ये खरेदी केली आहे. या जमिनीच्या खरेदीच्या व्यवहाराची नोंदणी १२ मार्च २०२६ रोजी येथील दुय्यम निबंधक सहकारी कार्यालयात झाली आहे. त्यानंतर १७ मार्च २०२६ रोजी तलाठी कार्यालयात या जमिनीच्या खरेदीची वर्दी नोटीसही प्रसिद्ध करण्यात आली होती.

त्यानंतर १३ एप्रिल २०२६ रोजी फेरफार मंजूरी आणि कल्पना खरात यांच्या नावाने सातबारा उतारा तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

मात्र चाणजे महसुली हद्दीतील अद्यावत करंजा मच्छीमार बंदर, कोकणशी जोडणारा करंजा - रेवस सागरी सेतू, रो-रो सेवा यामुळे या परिसरातील जागा जमिनींचे भाव आकाशाला भिडले आहेत.

उरणच्या चाणजे परिसरातील जमीनी ही सिडकोच्या भूसंपादनात आहे. येथील जमीनी खरेदी करून ती सिडकोला साडेबावीस टक्केसाठी वर्ग केल्यास उलव्यात मोक्याच्या ठिकाणी कोट्यवधी रुपयांचे विकसित भूखंड देण्यात येत आहेत. याचा लाभ अनेक राजकीय नेते व शासकीय उच्चपदस्थ यांनी घेतला यामधून शेतकऱ्यांकडून लाखात विकत

खरेदी खत करून ती सिडकोला साडेबावीस टक्केसाठी वर्ग केल्यास उलव्यात मोक्याच्या ठिकाणी कोट्यवधी रुपयांचे विकसित भूखंड देण्यात येत आहेत. याचा लाभ अनेक राजकीय नेते व शासकीय उच्चपदस्थ यांनी घेतला यामधून शेतकऱ्यांकडून लाखात विकत घेतलेल्या जमीनीना कोट्यवधी रुपये कमावले जात आहेत. त्यामुळे या जमीन खरेदीला महत्व आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खरेच मध्यरात्री उद्धव ठाकरेंशी भेट झाली का? CM देवेंद्र फडणवीसांचे सूचक विधान

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात विविध मुद्द्यांवरून आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदावे सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. बारामती पोटनिवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी पवार कुटुंबातून अनेक दावे करण्यात आले. यातच संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून केलेल्या विधानांवर राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. यात भर म्हणून बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी RSS आणि छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या विधानावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. यातच महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीवरूनही राजकीय घडामोडींना वेग येत आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, असा दावा करण्यात आला होता. यावर मुख्यमंत्री फडणवीसांनी ठाम शब्दांत भाष्य करत इशाराही दिला आहे. उद्धव ठाकरे हे मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्षा बंगल्यावर भेटल्याचा दावा करण्यात येत आहे. एका मीडिया प्लॅटफॉर्मने याबाबत एक्सवर पोस्ट केल्याने राज्यभरात चर्चांना उधाण आले. ही भेट नेमकी कोणत्या अनुषंगाने झाली, याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या भेटीचा तपशील समोर येऊ शकला नाही. विधान परिषद निवडणुकीवरून अनेक दावे-प्रतिदावे केले जात आहेत. उद्धव ठाकरे हे वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होऊ इच्छित नसल्याचे म्हटले जात असतानाच आता या भेटीच्या दाव्यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे. पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत प्रश्न विचारला. खरेच मध्यरात्री उद्धव ठाकरे यांच्याशी भेट झाली का, काय चर्चा झाली, अशा प्रश्न पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना विचारला. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे यांना मला भेटायचे असेल किंवा आमची भेट व्हायची असेल, तर ती लपूनछपून करण्याची आवश्यकता नाही. अशी भेट खुलेपणानेही होऊ शकते. असे कोणतेच विषय आमच्यात नाहीत की, जे आता लपवायची आवश्यकता आहे. अशा प्रकारची कोणतीही भेट घडलेली नाही. काही लोक जाणीवपूर्वक, चुकीच्या पद्धतीने खोट्या बातम्या देत आहेत. या खोटारड्या हँडल्सवर नोटीस बजावली जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान, संजय राऊत यांनाही पत्रकारांनी उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीबाबत विचारणा केली. यावर बोलताना, एक जागा महाविकास आघाडीला मिळाली आहे. त्यासंदर्भात हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली आहे. सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका जाहीर केली आहे. शिवसेनेने काय निर्णय घ्यायचा, कोणता उमेदवार द्यायचा, याबाबत उद्धव ठाकरे हेच निर्णय घेऊ शकतात. आता मुख्यमंत्री फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाली का, याचे उत्तर हे दोन नेतेच देऊ शकतात, असे संजय राऊतांनी सांगितले.

### मतदारसंघ निहाय परिशिष्ट 44 च्या प्रती लवकरात लवकर उपलब्ध करून द्या

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या मतदानावर सर्वच स्तरातून आजही शंका व संशय उपस्थित करण्यात येत आहे. लोकांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी २८८ मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना दिलेल्या मतदार संघ निहाय परिशिष्ट ४४ च्या प्रती लवकरात लवकर उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. संदेश कोंडविलकर यांनी केली आहे. ॲड. कोंडविलकर यांनी आज मंत्रालयात राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेऊन त्यांना या संदर्भातील पत्र दिले. पत्रात पुढे असे म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत झालेले मतदान व त्यानंतर जाहीर करण्यात आलेली आकडेवारी यामध्ये मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे. काँग्रेस पक्षासह इतर राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी मतदानाच्या आकडेवारीवर शंका उपस्थित केलेल्या आहेत. अनेकांनी निवडणूक आयोगाकडे यासंदर्भात विविध तक्रारीही करण्यात आलेल्या आहेत. विधानसभा निवडणूकीत व्होटचोरीचा नविन पॅटर्न राबविण्यात आला अशी जनभावना आहे त्यामुळे आयोगाने हे परिशिष्ट उपलब्ध करून द्यावेत असे ॲड. कोंडविलकर म्हणाले.

### अनिरुद्ध वनकर यांची अध्यक्षपदी नियुक्ती



मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या अध्यक्षपदी अनिरुद्ध वनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सचिव के.सी.वेणुगोपाल यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्यांची नियुक्ती केल्याचे म्हटले आहे.त्यांच्या नियुक्तीने राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### माओवादी कमांडर 'उर्मिला'ची शरणागती, 15 व्या वर्षी उचलले होते शस्त्र



गडचिरोली(दैनिक संध्या) : माओवाद्यांच्या हिंसक विचारसरणीत आयुष्याची १३ वर्षे खर्ची घातल्यानंतर अखेर छत्तीसगडच्या मोहला-मानपूर-अंबागढ चौकी जिल्ह्यातील शेवटची सक्रिय कॅडर मानल्या जाणारी कमांडर उर्मिला उर्फ टेटकी (२८) हिने २४ एप्रिल रोजी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. माओवाद्यांसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान, कमांडर उर्मिलाच्या शरणागतीनंतर २०२२ मध्ये उदयास आलेला मोहला-मानपूर-अंबागढ चौकी हा जिल्हा माओवादमुक्त झाला आहे. मूळची मानपूर तालुक्याच्या मुंजाल गावची रहिवासी असलेली उर्मिला केवळ १५ वर्षांची असताना जंकू नावाच्या जहाल माओवाद्याच्या संपर्कात आली. कोवळ्या वयात तिला बस्तरच्या कोयालीबेडा भागात नेऊन सशस्त्र संघटनेत भरती करण्यात आले. शस्त्र हाताळण्यापासून ते घातपाती कारवायांपर्यंतचे प्रशिक्षण तिला देण्यात आले होते. गेली १३ वर्षे ती रावघाट एरिया कमिटीत सक्रिय होती. उर्मिलाने आत्मसमर्पणासाठी घेतलेला निर्णय अतिशय थरारक होता. काही दिवसांपूर्वी तिने कोणतीही चाहूल लागू न देता संघटना सोडली. कोणताही शस्त्र सोबत न घेता बस्तरच्या घनदाट जंगलातून ती मानपूरच्या दिशेने पायी निघाली. एकीकडे सुरक्षा दलांची भीती आणि दुसरीकडे संघटनेकडून जिवाला असलेला धोका, अशा दुहेरी संकटात मृत्यूला चकवा देत तिने जिल्हा मुख्यालय गाठले. उर्मिलाने चौकशीत अनेक धक्कादायक माहिती दिली आहे. दीड महिन्यापूर्वी तिची भेट जहाल माओवादी चंदर आणि रुपी यांच्याशी झाली होती. एका चकमकीत रुपी मारली गेली, मात्र चंदर अजूनही आपल्या १०-१२ साथीदारांसह बस्तर भागात सक्रिय असल्याचे तिने सांगितले. या माहितीमुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. उर्मिला ही रावघाट एरिया कमिटीची सक्रिय माओवादी सदस्य होती, या कमिटीत ती कमांडर पदावर काम करायची. तिच्या डोक्यावर पाच लाखांचे इनाम होते.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्राला बळ

## महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान



मुंबई (दै. संध्या)


मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी 'रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल 'क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड'ने गौरविण्यात आले. भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात शुक्रवारी (दि. २४) महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक श्री. अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता श्री. शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ ट्क्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. हरित ऊर्जेला प्राधान्य मिळाल्याने शेतकऱ्यांना दिवसा व स्वस्त वीज उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. तर वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला 'क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड'ने गौरविण्यात आले.

तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक ९ लाख १७ हजार सौर पंप कार्यान्वित केले आहे. देशात सर्वाधिक ६४ टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ५ लाख ५ हजार (३४ टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहे. या योजनेतून केवळ ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप कार्यान्वित करण्याच गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे ४२ लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरु झाला आहे. त्याची दखल घेत या योजनेसाठी महावितरणला 'रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## महिंद्रा अँड महिंद्राच्या पेटंट पोर्टफोलिओमध्ये दशकभरात २० पटीने वाढ

मुंबई (दै. संध्या)




महिंद्रा अँड महिंद्रा (एमअँडएम) ने आरअँडडीमधील (संशोधन व विकास) सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि मेक इन इंडिया उपक्रमाप्रती आपली अढळ बांधिलकी अधोरेखित करत जाहीर केले आहे की, गेल्या एका दशकात कंपनीला मंजूर झालेल्या पेटंटच्या संख्येत 20 पटीने वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2016 मध्ये प्रारंभापासून फक्त 56 पेटंट मंजूर होते. ही संख्या आर्थिक वर्ष 2026 मध्ये 1,334 वर पोहोचली आहे.

मार्च 2026 पर्यंत महिंद्राने दाखल केलेल्या एकूण अर्जांची संख्या 2,728 आहे, ज्यामधून कंपनीची नाविन्यपूर्ण संशोधन आणि उत्कृष्टतेप्रती असलेली ओढ दिसून येते. एकूण 1,334 मंजूर पेटंटपैकी 60 टक्के पेटंट ऑटोमोटिव्ह (वाहन) व्यवसाय संबंधित आहेत, तर 40 टक्के पेटंट कृषी व्यवसाय संबंधित आहेत. विशेष म्हणजे, अर्जांचे पेटंटमध्ये रूपांतर होण्याचे प्रमाण आर्थिक वर्ष 2016 मध्ये 8 टक्के होते, ते गेल्या दशकात दाखल केलेल्या अर्जांसाठी आता 65 टक्क्यांपेक्षा जास्त झाले आहे.

एमअँडएमच्या पेटंट पोर्टफोलिओमधील या वाढीमधून कंपनीच्या विस्तारत असलेल्या संशोधन व विकास क्षमता दिसून येतात. या वाढत्या नाविन्यपूर्ण ताकदीमुळे कंपनीला नवनवीन प्रयोग करणे आणि ग्राहकांसाठी तंत्रज्ञानाने समृद्ध अनुभव तयार करणे शक्य झाले आहे. या पेटंट पोर्टफोलिओमध्ये एमअँडएमची उपकंपनी महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल लिमिटेडने दाखल केलेल्या अर्जांचाही समावेश आहे.

पेटंट्स व्यतिरिक्त, कंपनीने नाविन्यपूर्ण संशोधनातील उत्कृष्टतेसाठी अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळवले आहेत. फक्त गेल्या एका वर्षातच, एमअँडएमला सर्वोत्कृष्ट पेटंट पोर्टफोलिओसाठी सीआयआय आयपी अवॉर्ड, टॉप 50 इनोव्हेटिव्ह कंपनी २०२५ असण्यासाठी सीआयआय इनोव्हेशन अवॉर्ड, उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील भागीदारीसाठी सीआयआय नॅशनल अवॉर्ड, क्वेस्टेल आयपी एक्सलन्स अवॉर्ड आणि सीएमओ एशिया अवॉर्ड्स २०२५ मध्ये विशेष सन्मान मिळाला आहे.

## प्रायोगिक टप्प्यात १०२ ग्रामपंचायती 'बालस्नेही' होणार

मुंबई (दै. संध्या)

मिशन बालस्नेही महाराष्ट्र उपक्रमांतर्गत ३४ जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदांमधील प्रत्येकी तीन अशा एकूण १०२ ग्रामपंचायती 'बालस्नेही ग्रामपंचायत' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. या ग्रामपंचायतींमध्ये नियमित बालसभा आयोजित केल्या जातील तसेच सक्रिय बाल पंचायतांच्या माध्यमातून मुलांना त्यांच्या जीवनाशी संबंधित विषयांवर आपला आवाज मांडण्याचा अधिकार दिला जाणार आहे, अशी माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष डॉ. संजय पुराणिक यांनी दिली आहे. राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, यशदा आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन बालस्नेही महाराष्ट्र'च्या राज्यव्यापी अंमलबजावणीसंदर्भात धोरणात्मक सल्लामसलत बैठक नुकतीच मुंबईत आयोजित करण्यात आली होती. यावेळी यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, कोर फॅकल्टी डॉ. आर. व्ही. पोळे, युनिसेफच्या सोशल पॉलिसी स्पेशालिस्ट डॉ. देविका देशमुख उपस्थित होते. बैठकीत मुलांना शासनाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. राज्य आणि देशाच्या प्रगतीचा पाया हा मुलांच्या आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि संधींवर अवलंबून असल्याचे नमूद करण्यात आले. बालहक्क हे बहुआयामी असल्याने शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता, महिला व बालविकास आणि ग्रामीण विकास विभागांमध्ये प्रभावी समन्वय आवश्यक असल्यावर भर देण्यात आला. हा उपक्रम शाश्वत विकास ध्येयांशी संलग्न असून दारिद्र्य निर्मूलन, पोषण सुरक्षा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, लैंगिक समता आणि विषमता कमी करणे या उद्दिष्टांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेत पालकांचे हेलपाटे सुरूच

पिंपरी (दै. संध्या)

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेंतर्गत आकुर्डी येथील उन्नत शहर साधन केंद्रात पालकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. केंद्रातील सूचना फलकावर ठरावीक तारखा देऊनही प्रत्यक्षात उद्या या असे सांगत १५ एप्रिलपासून वारंवार केंद्रात येऊनही अद्याप ॲडमिट पत्र मिळालेले नाही, त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. आकुर्डी केंद्राची कामकाजाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी आहे. मात्र, शुक्रवारी सकाळी वेळेत आलो तरी ११:३० वाजल्यानंतर केंद्रात सोडले नाही, अशा तक्रारी काही पालकांनी केल्या. या केंद्रातील २२ पैकी केवळ १२ कर्मचारीच कार्यरत होते, तर १० कर्मचाऱ्यांना जनगणनेच्या कामावर पाठविल्याने कामकाजावर परिणाम झाला. त्यातच आरटीई संकेतस्थळाचा सर्व्हर डाऊन असल्याने अडथळे येत होते. या केंद्रात दररोज २०० अर्जांची पडताळणी केली जाते. पटपडताळणीच्या कामामुळे एकही कर्मचारी येथ हजर नव्हता. त्यामुळे मोठा गोंधळ उडाला होता. महापालिका शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीत बांगर यांनी स्वतः केंद्रात धाव घेतली होती. त्या दिवशी सुमारे ७५० पालकांची कागदपत्र जमा केली होती. यातील अनेक पालकांना आठवडा उलटूनही अद्याप ॲडमिट पत्र मिळालेली नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

## मानस प्रकल्पातून बालकांच्या मानसिक आरोग्यास बळकटी

### राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. संजय पुराणिक

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व मनमुक्त फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानस प्रकल्प-सुरक्षित बालपण, समृद्ध महाराष्ट्र' अंतर्गत बालकांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असून, याची सुरुवात प्रायोगिक तत्वावर राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती राज्य हक्क बाल संरक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. संजय पुराणिक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

सद्यस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वाढता तणाव, नैराश्य आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या जतनासाठी समग्र दृष्टिकोन अवलंबण्यात येणार असून, त्यात पालक व शिक्षकांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. या विषेश अभियानासाठी लवकरच जिल्ह्यांची निश्चिती करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्व-जाणीव, भावनिक बुद्धिमत्ता, तणाव व्यवस्थापन, निर्णयक्षमता व नेतृत्वगुण विकसित करण्यावर या प्रकल्पाचा भर असेल. इयत्ता पहिली ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येणार असून, तो मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व समुपदेशक यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित केला जाणार आहे. यामध्ये ॲक्टिव्हिटी वर आधारित आणि शिकण्यातून प्रयोगशील अनुभव घेण्याच्या पद्धतीचा वापर केला जाईल. पालकांसाठी 'कॉन्शियस पॅरेन्टिंग' व संवाद कौशल्य प्रशिक्षण, तर शिक्षकांसाठी भावनिक सहाय्य व वर्ग व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. वर्षभर चालणाऱ्या या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सकारात्मकता व भावनिक स्थैर्य वाढण्यास मदत होईल, तसेच शाळांमध्ये तणावमुक्त व सहकार्यशील वातावरण निर्माण होईल. पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने विस्तारण्याचा मानस असून, शालेय शिक्षण व्यवस्थेत मानसिक आरोग्याचा समावेश करण्यासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे डॉ. पुराणिक यांनी सांगितले. या उपक्रमात सर्व शाळा, पालक व शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही आयोगामार्फत करण्यात आले आहे.

# महायुती सरकारमध्ये भ्रष्टाचाराचा कळस : नाना पटोले

### चार आयएएस अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण लवकरच उघड करणार : भाजपाचा महिलांबद्दलचा कळवळा बेगडी; महिला आरक्षण विधेयक २०२३ सालीच मंजूर

मुंबई (दै. संध्या)



भारतीय जनता पक्ष हा खोटारडा असून महिलांबाबतचा त्यांचा कळवळा बेगडी आहे. खोटं बोल पण रेटून बोल, ही त्यांची पद्धत आहे. २०२३ सालीच महिला आरक्षण विधेयक संसदेत सर्व पक्षांच्या पाठिंब्याने पास झालेले आहे, त्याची अंमलबजावणी भाजपा करत नाही तर १६ एप्रिलला जे विधेयक लोकसभेत सादर केले होते ते देश तोडणारे होते, त्यामुळे भाजपाचा बेबनाव उघड झाला आहे, असे कॉंग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, महिला आरक्षणचा कायदा झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी गुजरातमध्ये स्वतःचा मोठा सत्कार करून घेतला होता, आता मात्र ते विरोधी पक्षांना महिला विरोधी ठरवत आहेत, हा त्यांचा दुटप्पीपणा आहे. भाजपाला सत्तेचा माज आला आहे, हे वरळीतील मोर्चात दिसून आले, मोर्चामुळे वाहतूक कोंडी झाल्याने एका महिलेने संताप व्यक्त केला तो योग्यच होता, त्या महिलेने भाजपाला त्यांची जागा दाखवून दिली आहे. लोकांना भाजपाचा खरा चेहरा कळलेला आहे, असेही नाना पटोले म्हणाले..

भाजपा युती सरकारमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे. सरकारमध्ये काही आलबेल नाही, तीन तिघाडा काम बिघाडा आहे, मंत्र्यांमध्येच मलई खाण्याची स्पर्धा लागलेली नाही तर प्रशासनातील वरिष्ठ आयएएस अधिकारीही भ्रष्टाचारात आकंठ बुडले आहेत. राज्यातील चार आयएएस अधिकारी जमीन व्यवहारात फुटपट्टीने मोजून पैसे वसूल करतात, त्यांची फाईल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे पाठवणार आहे, त्यांनी कारवाई नाही केली तर विधानसभेत हे प्रकरण मांडू, असा इशारा नाना पटोले यांनी दिला आहे.

मुंबईतील रिक्षा टॅक्सी चालकांनी मराठी शिकावे अन्यथा त्यांचे परवाने रद्द करू असे फर्मान सरकारने काढले आहे त्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, धर्म, जात व भाषेच्या नावावर फूट पाडणे चुकीचे आहे. ज्याला शिकायचे आहे ते शिकतील पण जबरदस्ती करायचे काय कारण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रात येतात तेव्हा त्यांनाही मराठीतच भाषण करायला सांगणार का? असा प्रश्न विचारून हे महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही. सर्व जाती, धर्म व भाषेचा सन्मान केला पाहिजे ही शिकवण आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांनी दिली आहे. द्वेष करण्याचे पाप सरकार करत आहेत, त्यांना जनता माफ करणार नाही असेही नाना पटोले म्हणाले.

### भारताला 'नरक' म्हटले तरीही मोदी गप्पच का?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेसमोर भारत गहाण ठेवला आहे. डोनाल्ड ट्रम्प भारताला नरक म्हणतात आणि तरिही आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी काहीच बोलत नाहीत. भारत देश स्वर्ग आहे असे आपले साधू संत सांगतात मग डोनाल्ड ट्रम्प नरक म्हणतात, त्यावेळी राग आला पाहिजे मोदी गप्प बसले आहेत पण सरसंघचालक मोहन भागवत का गप्प बसले आहेत. नरेंद्र मोदी ट्रम्पला सरंडर झाले आहेत हे पुन्हा पुन्हा दिसत आहे, यांच्या पापाचा घडा आता भरला आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

# जिल्हा बँकेच्या पुरंदर विभागाला २३ कोटी ६३ लाखांचा नफा

## संचालक संजय जगताप यांची माहिती

**सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षात पुरंदर तालुक्यातील १३ शाखांमधून सभासदांना ३२४ कोटी ७१ लाख इतके कर्ज वाटप केले. त्यापैकी २४३ कोटी ८५ लाख रुपये एवढी रक्कम आणि ७५.१० टक्के एवढी वसुली होऊन बँकेला २३ कोटी ६३ लाख ९७ हजार रुपये इतका नफा झाल्याची माहिती जिल्हा बँकेचे संचालक व पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी दिली.

चालू खरीप हंगामाला १ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली असून तालुक्यातील ९७ संस्थांपैकी ९७ संस्थांचे पिक कर्ज मंजूर झाले असून ५ एप्रिल पासून खरीप हंगाम वाटपास सुरूवात झाली आहे. याबाबत संजय जगताप यांनी तालुक्यातील सर्व विकास अधिकारी व सचिव यांची बैठक घेऊन ज्या शेतकरी सभासदांनी ३१ मार्च अखेर त्यांच्याकडील कर्जाचा भरणा केला असेल त्यांना क्षेत्राप्रमाणे रक्कम वाटप करण्याच्या सूचना केल्याची



माहिती विभागीय अधिकारी महेश खैरे यांनी दिली.

दरम्यान, दि. २० एप्रिल २०२६ पर्यंत ११ हजार ५५६ सभासदांना ११६ कोटी ३२ लाख ५९ हजार इतके कर्जवाटप केले आहे. ३० सप्टेंबर पर्यंत सर्व शेतकरी सभासदांना तालुक्यातील १३ शाखांमधून खरीपाचे पिक कर्ज वाटप पूर्ण करण्याच्या सूचना संचालक संजय जगताप यांनी दिल्या आहेत. सदर बैठकीला वसुली अधिकारी किरण जाधव, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, विकास अधिकारी राजन जगताप, जयेश गद्रे, अण्णा शिंदे, शिरीष जाधव, मयूर भुजबळ, पवन दुर्गाडे, शरद वणवे, यांसह सचिव रफिक शेख, तुकाराम गायकवाड, हनीफ सय्यद, रवींद्र कांबळे, संदीप ताकवले, दीपक जगताप, अमोल यादव, विजय कांबळे, वैभव काकडे, अमोल फडतरे, जालिंदर बाठे, रसूल शेख, संतोष गुरव, सोमनाथ चव्हाण, दादा खोमणे, चंदू खोमणे, नितीन जगताप, सतीश शिंदे, सुहास जगताप इत्यादी उपस्थित होते.

**१०० टक्के वसुल संस्था - २६**

- ९० ते ९९ .९९ टक्के वसुल संस्था - १५.
- ८० ते ८९ . ९९ टक्के वसुल संस्था - १५.
- ७० ते ७९ . ९९ टक्के वसुल संस्था - १६.
- ६० ते ६९ . ९९ टक्के वसुल संस्था - १२.
- ५० ते ५९ . ९९ टक्के वसुल संस्था - ०५.
- ५० टक्केच्या आतील वसुल संस्था - ०८.

**ठेवीचे उद्दीष्ट पार :** ३१ मार्च २०२६ अखेर जिल्हा बँकेने पुरंदर तालुक्यातील शाखांसाठी ६४६ कोटी ठेवींचे उद्दीष्ट ठेवले होते. उद्दीष्टाचा हा टप्पा पार करीत पुरंदर तालुक्यातील १३ शाखांतून ७०४ कोटी ३३ लाख ९७ हजार ठेवी जमा केल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### आगापे इन्स्टिट्यूट पुणे तर्फे पदवीदान सोहळा उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : आगापे इन्स्टिट्यूट पुणे तर्फे पदवीदान सोहळा उत्साहात संपन्न झाला. आगापे इन्स्टिट्यूट तर्फे 24 विद्यार्थ्यांचा ईश्वरविज्ञान अभ्यासक्रमाचा पदवीदान कार्यक्रम कॅम्प येथे प्रिन्सिपॉल जोमन मॅथ्यूज व डॉ.डब्ल्यू एस ॲनी यांच्या हस्ते सोहळा पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे पास्टर रॉबिन महाडकर, पास्टर.अनिल गडकरी सर, पास्टर राजेश केळकर, बिशप प्रदीप वाघमारे, इत्यादी उपस्थित होते. यावेळी जॉइल्स त्रिभुवन, संगीता आरसूड, अंजना गुरव, मारिया देठे यांना गुणवत्तेसाठी विशेष सन्मानित करण्यात आले. तसेच 84 व्या वर्षी रजनी साळवे यांनी अभ्यासक्रम पूर्ण करून आपले अष्टपैलूत्त्व सिद्ध केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पा. राजेश केळकर, यांनी केले तर आभार रजनी साळवे यांनी मानले.

### शंकरराव ननावरे यांचे निधन



सासवड : (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील पांगरे येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांचे पदाधिकारी शंकरराव मारुती ननावरे (वय ७९ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. सहकारमहर्षी चंदुकाका जगताप आणि माजी आमदार संजय जगताप यांचे खंदे समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. पांगरे विकास सोसायटीचे माजी चेअरमन व ३८ वर्षे संचालक, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेचे सल्लागार, श्री निष्णाई फळ प्रक्रिया उद्योगाचे चेअरमन तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून काम केले होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विशाल ननावरे आणि संत सोपानकाका सहकारी बँकेचे कर्मचारी प्रवीण ननावरे यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनाने पांगरे व पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

### पुणे जिल्हाध्यक्षपदी ॲड. धनंजय तुकाराम बुद्धिवंत यांची नियुक्ती

पुणे : (दैनिक संध्या) : भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) इंटकच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी ॲड.धनंजय तुकाराम बुद्धिवंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष हौशिल प्रसाद शर्मा यांच्या आदेशानुसार हे नियुक्तीपत्र भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटकचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुभाष माछरे यांच्या हस्ते देण्यात आले, ही नियुक्तीपत्र देताना ॲड. धनंजय बुद्धिवंत यांनी सांगितले मजुरांच्या हिताचे रक्षण करणे. त्यांना न्याय मिळवून देणे आणि कामगारांच्या जीवनात सुधारण हा इंटक चा मुख्य उद्देश आहे. असे यावेळी सांगितले.

### विश्वमंगल मराठी फाऊंडेशन वतीने नामांकित उद्योजकांसोबत परिसंवाद तसेच मार्गदर्शन

कोरेगावमुळ : (दैनिक संध्या) : मराठी भाषा, संस्कृती आणि उद्योजकतेला जागतिक स्तरावर नेण्याचा ध्यास घेऊन कार्यरत असलेले विश्वमंगल मराठी फाऊंडेशन मराठी मनांना एकत्र आणून नव्या संधी निर्माण करणारे एक प्रभावी व्यासपीठ. इथे भाषा जपली जाते, उद्योजकतेला चालना मिळते आणि स्वप्नांना मिळतात जागतिक पंख. चला या प्रवासाचा भाग बनूया आणि मराठीचा मान जगभर वाढवूया. झेंडा मराठीचा, मराठी भाषेचा, मराठी कर्तृत्वाचा या खास कार्यक्रमात. नामांकित उद्योजकांसोबत परिसंवाद. तज्ज्ञ मार्गदर्शन आणि प्रेरणादायी विचार. नवउद्योजकांसाठी सुवर्णसंधी. दिनांक -१ मे २०२६, वेळ - सकाळी १०:०० वाजता. स्थळ: फ्रुटवाले धर्मशाळा, आळंदी, पुणे. या अविस्मरणीय सोहळ्याचे साक्षीदार व्हा आणि मराठी उद्योजकतेच्या नव्या पर्वाची सुरुवात अनुभवण्यासाठी नक्की उपस्थित राहा असे आवाहन विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती संस्थापक अध्यक्ष लोकमंगल परिवार तथा आमदार सुभाष देशमुख असणार आहे. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेष्ठ निरुपणकार प्रख्यात वक्ते विवेक घळसासी असणार आहे. उद्योजकीय परिसंवादात सहभागी मान्यवर उद्योजक डॉ. संजय वायाळ, आंतरराष्ट्रीय सुवर्ण व्यावसायिक अप्पासाहेब कोंढारे, वैज्ञानिक उदय भोसले असणार आहे.

## वारंवार बत्ती होतेय गुल

**चाकण (दै. संध्या)**

चाकण पंचक्रोशीतील अनेक भागात महावितरण विभागाकडून कोणतीही पूर्वसूचना न देता भारनियमनाच्या नावाखाली केवळ सिंगल फेज वीजपुरवठा केला जातो. वारंवार बत्ती गुल होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चाकण परिसरातील छोटी मोठी गावे व वाडी - वस्तीवर सिंगल फेज वीजपुरवठा होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. कुट्टी मशीन, स्ट्रीट लाईट, दुध काढण्याच्या मशीन, पिठाच्या गिरण्या तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे विज पंप, यांसारखी अनेक उपकरणे पूर्णपणे बंद पडली आहेत. त्यामुळे शेती व दुग्ध व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी व आक्रोश निर्माण झाला आहे. भविष्यात जर असा कोणताही भारनियमनाचा निर्णय घ्यायचा असेल, तर तो शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन किंवा त्यांच्याशी सविस्तर चर्चा करूनच घ्यावा आणि त्यापूर्वी योग्य ती पूर्वकल्पना देण्यात यावी, अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात घेता महावितरण विभागाने तातडीने सिंगल फेज वीज पुरवठ्याचा निर्णय रद्द करून पूर्ववत नियमित वीजपुरवठा सुरू करणे अपेक्षित आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. वीजपुरवठा सुरळीत केला नाही, तर महावितरणच्या कार्यालयावर आंदोलन करू असा इशारा राहुल कांडगे यांनी दिला.

## पुरंदर तालुक्यात ‘इंद्रनील’ पुरंदर जैवविविधता केंद्राचे उद्‌घाटन

**सासवड (दै. संध्या)**




पुरंदर तालुक्यातील जैवविविधता चे संवर्धन व जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा एक भाग म्हणून तालुक्यातील गोटेमाळ येथील ग्रामगौरव प्रतिष्ठानच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्रात "इंद्रनील" जैवविविधता केंद्राचे उद्घाटन आधारकर रिसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. विनया घाटे यांच्या हस्ते करण्यात आले. पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ

ऑप्टिमा लाईफ सायन्सचे चेअरमन विनय कुलकर्णी, वाघीरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित शेळके आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

ताम्हण वृक्षाचे वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रतिष्ठानच्या

**ग्रामगौरव प्रतिष्ठानचा उपक्रम**

कार्यकारी विश्वस्त डॉ. सोनाली शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्तविक केले. स्थानिक जैव विविधतेचे प्रदर्शन, शाश्वत विकास उपक्रम व त्याची माहिती, पर्यावरण संवर्धन विषयक मार्गदर्शन, पक्षी, प्राणी, वन्य जीव यांचे पोस्टर, माहिती फलक, देशी बियाणे बँक व त्याची माहिती अशा स्वरूपातील हे इंद्रनील केंद्राचे काम असल्याचे सांगण्यात आले. योगेश मगर यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख भाषणांत डॉ. विनया घाटे यांनी पर्यावरण संवर्धन करताना विवेक महत्वाचा असल्याचे प्रतिपादन केले.

एचसीएल फाऊंडेशन व ऑप्टिमा लाईफ सायन्सचे या उपक्रमास आर्थिक पाठबळ आहे. कार्यक्रमास कल्पना साळुंके, समूचित इन्व्हायरो टेकच्या डॉ. प्रियदर्शिनी कर्वे, ऊर्जाबॉक्सच्या विशाखा चांधेरे, देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोले यांसह अनेक पर्यावरणप्रेमी हजर होते. प्रशांत बोरावके यांनी सूत्रसंचालन केले तर प्रसाद सेवेकरी यांनी आभार मानले.

## नाशिकच्या सैनिकी सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रातून दोन विद्यार्थिनींची अंतिम निवड

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडून अभिनंदन

**मुंबई (दै. संध्या)**




नाशिक येथील मुलींच्या सैनिकी सेवापूर्व प्रशिक्षण संस्थेने उल्लेखनीय यश मिळवले असून या केंद्रातून राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) साठी दोन विद्यार्थिनींची अंतिम निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थिनींनी देशपातळीवर मुलींमध्ये अनुक्रमे दुसरा आणि पंधरावा क्रमांक मिळवला आहे. देशभरातून केवळ १९ मुलींची एनडीए साठी निवड होत असताना नाशिकच्या या केंद्राने मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद मानले जात आहे. निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये कुमारी जिया सचिन करपे हिने मुलींमध्ये अखिल भारतीय स्तरावर दुसरा क्रमांक (AIR-2) मिळवला आहे, तर कुमारी समृद्धी प्रविण इंगळे हिने १५ वा क्रमांक (AIR-15) पटकावला आहे. दोन्ही विद्यार्थिनींनी कठोर परिश्रम, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून नाशिक येथे १८ जून २०२३ रोजी मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था सुरू करण्यात आली. राज्यातील मुलींना संरक्षण दलात अधिकारी म्हणून संधी मिळावी, या उद्देशाने ही संकल्पना राबविण्यात आली आहे. या संस्थेत इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थिनींना दोन वर्षांचा विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम दिला जातो. या संस्थेची स्थापना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे माजी सैनिक कल्याण विभाग असताना करण्यात आली होती. विशेष बाब म्हणजे मुलींसाठी एनडीए भरतीपूर्व प्रशिक्षण देणारे हे देशातील पहिलेच केंद्र आहे. यापूर्वीही या संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली असून मागील वर्षी हंसिका टिल्लू हिची एनडीए साठी निवड झाली होती. यंदा दोन विद्यार्थिनींची अंतिम निवड झाल्यामुळे या संस्थेच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे.

नाशिकमधील हे केंद्र भविष्यात अधिकाधिक विद्यार्थिनींना सशस्त्र दलात अधिकारी होण्यासाठी प्रेरित करेल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.

## वारजे भागात थरार! सलूनमध्ये केस कापत असतानाच गोळीबार

**पुणे (दै. संध्या)**



वारजे परिसरातील चैतन्य चौकात शुक्रवारी सायंकाळी सलूनमध्ये गोळीबाराची घटना घडली. या घटनेत केस कापत असताना निहाल शिंदे याच्या डाव्या कानाजवळ गोळी लागून तो जखमी झाला असून, अमोल आढाव हाही जखमी झाला आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निहाल शिंदे हा सलूनमध्ये केस कापत असताना अचानक आरोपींकडून गोळीबार करण्यात आला. या वेळी झालेल्या झटापटीत अमोल आढाव यालाही दुखापत झाली. या प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींची ओळख पटविली असून, साहिल राऊत याला गुन्हे शाखेच्या तपास पथकाने घटनास्थळीच ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. दरम्यान, जानेवारी २०२३ मधील निहाल शिंदे आणि आरोपी यांच्यातील पूर्ववैमनस्यातून ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली. पुढील तपास वारजे पोलिस करत आहेत.

## न्यू इंग्लिश स्कूल जवळार्जुनमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न




**जेजुरी (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल जवळार्जुन येथे अठरा वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन मेळावा पार पडला. तब्बल 18 वर्षांनंतर गावातील सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्याने विद्यार्थ्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन सुजित राणे यांनी केले होते. या मेळाव्यात माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी ढोल-लेझीम, फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोषात शाळेत प्रवेश केला. विद्यालयातील लेझीम पथकाने त्यांचे औक्षण करून फुलांच्या वर्षावात स्वागत केले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. माजी आमदार चंदुकाका जगताप, सरस्वती माता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तमराव निगडे तसेच सर्व आजी माजी शिक्षकांचा सन्मान करून माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला स्मार्ट टीव्ही व साउंड बॉक्स भेट देण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत प्रवीण टेकवडे, किशोर राणे, आकाश दळवी, निखिल टेकवडे, सागर टेकवडे, समीर मोरे, शहाजी राणे आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन जगन्नाथ ह टेकवडे यांनी केले, तर आभार प्रवीण टेकवडे यांनी मानले.

# बँकिंग साक्षरता वाढवण्याची गरज - सतीश मराठे

**पुणे (दै. संध्या)**



दैनंदिन व्यवहारात नागरी सहकारी बँकांनी बदलत्या काळानुसार सर्वंकष बदल करणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात गुंतवणूकदारांबरोबरच कर्जदार देखील चिकित्सक झाला आहे, त्यामुळे विश्वासार्हता जपण्याबरोबरच बँकिंग साक्षरता वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रिझर्व्ह बँक आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांनी आज येथे व्यक्त केले.

सहकार सुगंध आयोजित "बदलते बँकिंग" या परिसंवादात ते बोलत होते. जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ गणेश निमकर लिखित "बँकिंग साक्षरता" या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. त्यानिमित्ताने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे, बुलडाणा क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, नॅफकबचे उपाध्यक्ष मिलिंद काळे, महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा, सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी आणि पुस्तकाचे लेखक गणेश निमकर व्यासपीठावर उपस्थित होते. राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे आणि राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी दृकश्राव्य माध्यमातून यावेळी शुभेच्छा दिल्या.

परिसंवादात बोलतांना मराठे पुढे म्हणाले की, सध्याच्या स्थितीमध्ये देशातील किमान 50 टक्के जनता बँकिंग क्षेत्रापासून दूर आहे. त्याचबरोबर आर्थिक साक्षरता वाढावण्याची गरज आहे. एकीकडे गुंतवणूकदारांची संख्या वाढत आहे, कर्ज व्यवहार देखील वाढत आहेत, तर दुसरीकडे व्याजदर दिवसेंदिवस कमी होत आहेत. या बदलत्या बँकिंगच्या दृष्टीने ग्राहकांमध्ये बँकिंग साक्षरता होणे आवश्यक असून त्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणारे आहे. जिल्हा आणि नागरी सहकारी बँकेत काही संचालक वर्षानुवर्षे कार्यरत आहेत. तर काही बँका या मुख्य कार्यकारी अधिकारीच चालवितात. नव्या लोकांना आणि विशेषत: तरुणांना सहकारात काम करण्यास वाव मिळावा, याद्दष्टीने नागरी सहकारी बँकांमध्ये संचालकांना असलेला दोन टर्म कालमर्यादेचा कायदा योग्यच असल्याचे त्यांनी यावेळी ठामपणे सांगितले. केंद्र सरकारचे नियम सर्वच बँकांना बंधनकारक आहेत. नागरी बँकांचे प्रश्न सोडविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आता स्वतंत्र फोरम देखील निर्माण केला आहे. यावेळी डॉ. जोशी म्हणाले की, एकूणच बँकांची संख्या कमी करण्याचे रिझर्व्ह बँकेचे धोरण आहे. तर नवीन बँक परवान्याबाबत नेमके धोरण अद्याप ठरलेले नाही. याबाबत सहकार मंत्रालयाने नव्याने अभ्यास गट नियुक्त केला असून त्याबाबत विचार विनिमय सुरू आहे. निवडक मोठ्या काही पतसंस्थांचे रूपांतर नागरी बँकेमध्ये करण्याच्या दृष्टीने विचार सुरू आहे. सुमारे 2003 पासून नवीन बँकेला परवानगी मिळालेली नसल्याने परिणामी पतसंस्था वाढीस प्राधान्य मिळाले आहे. यावेळी चांडक म्हणाले की, यापुढील काळाची गरज लक्षात घेता सामाजिक बँकिंग क्षेत्र वाढविण्यावर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे. या उपक्रमामुळे बँकिंग क्षेत्रातील ठेवी वाढण्यास मदत होणार आहे. आम्ही गेली अनेक वर्षे जाणीवपूर्वक हा प्रयत्न करीत आहोत. यावेळी आयुक्त कवडे यांनी सांगितले की, सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा खर्च कमी व्हावा असा प्रयत्न आहे. यासाठी डिजिटायझेशनवर अधिक भर देण्याची आम्ही योजना सुरु केली आहे. यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता देखील वाढणार आहे. निवडणुकीसाठी इव्हीएम यंत्रणेचा वापर करावा यासाठी निवडणूक आयोगाला प्रस्ताव दिला आहे, याद्दष्टीने निवडणूक प्राधिकरणाने नवीन सॉफ्टवेअर देखील तयार केले आहे. यावेळी काळे म्हणाले की, आजवर कॉसमॉस बँकेत 19 बँकांचे विलीनीकरण करण्यात आले आहे. जेथे व्यवसायिकदृष्ट्या चुकीचे निर्णय झाले होते, तेथील सहकारी बँकांचे कॉसमॉस बँकेमध्ये विलीनीकरण करुन घेतले आहे, मात्र जेथे भ्रष्ट मार्गांचा अवलंब झाल्याने बँक अडचणीत आली आहे, अशा बँका आम्ही घेतलेल्या नाहीत. विलिनीकरणाच्या माध्यमातून नवीन भागात शाखा विस्तार आणि व्यवसाय वाढीस मोठी संधी आहे. यावेळी ब्रम्हेचा म्हणाले की, सध्याच्या काळात बँकांसाठी नवीन परवाने मिळणे अवघड आहे, तर पतसंस्थांचे रूपांतर बँकेत करता येणे शक्य होणार आहे. याबाबत विविध पतसंस्थांबरोबर चर्चा सुरु आहे. यावेळी जुगादे यांनी सांगितले की, राज्याचे नवीन सहकार धोरण तयार होत असतांनाच सहकार कायदा देखील नव्याने तयार होत आहे. नवीन स्पर्धात्मक युगाचे भान, तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर आणि तरुणाईच्या सहकाराकडून अपेक्षा यांचा समावेश नव्या कायद्यात व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

यावेळी पुस्तकाचे लेखक निमकर यांनी पुस्तक लेखनामागची भूमिका विषद केली तर पुस्तकाचे प्रकाशक व सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले. पुस्तकाच्या निर्मितीसाठी योगदान देणारे जयंत काकतकर, राजेंद्र पोतनीस, प्रमोद महाजन आणि प्रणिता महाजन यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.